# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ / फाल्गुन १९, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(८) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

## राज्यातील विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक व प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) * ७५२५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अरुण लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची सध्या सुमारे १३,००० पदे रिक्त असून, त्यापैकी ४० टक्के कोट्यानुसार सुमारे ५,०१२ पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली असतानाही, गेल्या दोन वर्षांपासून प्राध्यापक भरती प्रक्रिया प्रलंबित आहे, तसेच पुणे विद्यापीठासह राज्यातील विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या एकूण ३८४ पदांपैकी फक्त १० पदे कार्यरत असून उर्वरित पदे रिक्त असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक भरतीची प्रक्रिया मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असतानाच दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या भरतीसाठी जाचक अटी विहित केल्या असून, उक्त अटी मागे घेण्याची विनंती महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (एम फुक्टो) आणि इतर संघटनांनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राध्यापकांच्या रिक्त पदांची संख्या १,१६६ इतकी असून नागपूर विद्यापीठात २५८ पदे, पुणे विद्यापीठात १९९ पदे आणि मुंबई विद्यापीठात १६७ पदे रिक्त असून, सदर विद्यापीठांतील पदे मोठ्या

प्रमाणात रिक्त असल्यामुळे विद्यापीठांमधील नियमित शैक्षणिक कार्य, संशोधन आणि 'नॅक' मानांकनावर विपरीत परिणाम होत असून अध्यापन व प्रशासकीय कामांचा भार कंत्राटी किंवा तासिका तत्त्वावरील शिक्षकांवर येत असल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) निर्देशांनुसार तसेच राज्यपाल व कुलपती यांनी मान्यता दिलेल्या ६०- ४० या नवीन भरती फॉर्म्युल्याला शासनाने मान्यता दिली असतानाही, राजकीय हस्तक्षेपामुळे भरतीचा फॉर्म्युला वारंवार बदलला जात असल्याने सदर भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे विद्यापीठातील शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तसेच विद्यापीठे व महाविद्यालयांमधील अध्यापन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी शासनाने ५०- ५० किंवा ६०- ४० यापैकी कोणता भरती फॉर्म्युला अंतिमरित्या मान्य केला आहे, तसेच प्राध्यापकांच्या १३,००० रिक्त पदांची भरती निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात ११,९१८ रिक्त पदांपैकी ५,०१२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकूण मंजूर ३८४ पदांपैकी १४८ पदे भरलेली असून २३६ पदे रिक्त आहेत.

शासन निर्णय ११/०२/२०२६ नुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सध्या सुरु असलेली अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये एकूण २,६०० शिक्षकीय पदे मंजूर असून त्यापैकी १,४९७ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये नागपूर-२०९, पुणे-२४२ व मुंबई-२३५ पदांचा समावेश आहे. तसेच, १,४९७ रिक्त पदांपैकी शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये ६५९ पदांना व शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये २८ पदांना अशा एकूण ६८७ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ मधील तरतुदींनुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात पदभरती सुरू असून ११,९१८ रिक्त पदांपैकी ५,०१२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, सार्वजनिक विद्यापीठांमधील पदभरती शासन निर्णय दिनांक११/०२/२०२६ मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक आणि संशोधनासाठी ६०%, अध्यापन कौशल्य मूल्यांकनासाठी २०% आणि मुलाखत कामगिरीसाठी २०% या सुधारित तरतुदीनुसार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(६) वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय/निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीबाबत

**(२) * ७३९५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व त्यांचे कुटुंबियांना वैद्यकीय उपचार केल्यानंतर वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती हवी असल्यास प्रथम स्वतः पैसे खर्च करावे लागतात व नंतर जिल्हा परिषदेमध्ये प्रस्ताव सादर करून वैद्यकीय देयकाचे पैसे परत मिळतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैदयकीय प्रतीपूर्तीची देयके कर्मचाऱ्यांना विलंबाने मिळत असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वैदयकीय उपचारामध्ये निर्माण होणारा व्यत्यय टाळण्यासाठी तसेच काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने उपचारादरम्यान पैसे भरणे शक्य नसल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, ही बाब विचारात घेऊन राज्य शासनातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा कॅशलेस उपलब्ध असून सदर सुविधा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळीच वैदयकीय उपचार घेणे शक्य व्हावे यासाठी 'कॅशलेस' योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक २८/०७/२०२३ महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेनुसार राज्यातील शासकीय/ निमशासकीय कर्मचाऱ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये ५ लक्ष एवढे आरोग्य संरक्षण आहे.अनुदानित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचादेखील या योजनेत समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: नागपूर विभागातील खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतन देयके प्रलंबित असल्याबाबत

**(३) * ६८३४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतन देयके गत दोन वर्षापासून प्रलंबित असून नागपूर विभागातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या ६३२ प्राथमिक शिक्षकांचे माहे एप्रिल, २०२५ पासून वेतन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित देयकांना शिक्षण संचालक कार्यालयाकडून वेळेत मान्यता न दिल्यामुळे, प्रत्यक्षात तरतूद उपलब्ध असूनही संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाच्या थकीत रक्कमा मिळू शकल्या नाहीत, तसेच सदर प्राथमिक शिक्षकांचे वेतन दोन आठवड्यांच्या आत अदा करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले असूनही मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अद्याप पालन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तसेच नागपूर विभागातील ६३२ प्राथमिक शिक्षकांचे वेतन न मिळाल्यामुळे संबंधित शिक्षकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तसेच नागपूर विभागातील ६३२ प्राथमिक शिक्षकांचे थकित वेतन अदा करण्याबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) सन २०२४-२५ मध्ये नागपूर विभागातील खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत वेतन देयके शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांचेकडून पारीत करण्यात आली होती, तथापि, ३१ मार्च, २०२५ रोजी रात्री ११.०० वाजता च्या दरम्यान मंजूर झालेली अशी वेतन देयके वेळेअभावी व्यपगत झाल्याने मंजूर करता आली नाही. सन २०२४-२५ मधील प्रलंबित थकीत देयके तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील थकीत देयके ऑनलाईन पध्दतीने फॉरवर्ड करण्याची कार्यवाही जवळपास पूर्ण झाली आहे.

तथापि, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयाकडून शालार्थ आयडी प्रदान करण्याबाबतचे आदेश निर्गमित झालेले नसताना प्राथमिक विभागात शालार्थ प्रणालीमध्ये अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह मुख्याध्यापकांची नावे समाविष्ठ करून शासकीय निधीचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले. प्रस्तुत प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत तपास सुरु आहे.

सदर प्रकरणामध्ये बनावट शालार्थ आयडी देण्यात आलेले असल्यामुळे अधीक्षक, वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी (प्राथमिक) नागपूर यांनी माहे मार्च, २०२५ चे वेतन देयक स्विकारतांना, शालार्थमध्ये नाव समाविष्ठ असल्याचे व वैयक्तिक मान्यता आदेशाची प्रत सादर केल्यावरच देयक स्विकारण्यात येईल अशा सूचना निर्गमित केल्या. ज्या शाळेने सदर कागदपत्रे सादर केले त्यांचे मार्च, २०२५ पासूनचे वेतन देयक पारीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. परंतु जे शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी उपरोक्त कागदपत्रे सादर

करू शकले नाही अशा शिक्षक/शिक्षकेतर यांचे माहे मार्च-२०२५ पासूनचे वेतन देयक स्विकारण्यात आले नाही.

सदर प्रकरणी आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अंतरिम अहवालामध्ये नमूद ६३२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी ज्यांचे कुठलेही शालार्थ आयडी तसेच वैयक्तिक मान्यतेची नस्ती उपलब्ध नाही अशा कर्मचाऱ्यांची सुनावणी घेवून निर्णय देण्याचे आदेश निर्गमित केले.

त्यानुसार, ६३२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांचे सुनावणीत वैयक्तिक मान्यता वैध ठरल्या त्यांचे वेतन सुरू करण्याचे आदेश निर्गमित केले आहे. तथापि, ज्यांच्या वैयक्तिक मान्यता अवैध ठरल्या आहेत अशा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन अनुज्ञेय ठरत नाही.

सदर ६३२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी अनेक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे जवळपास ८४ रिट याचिका दाखल केल्या असून रिट याचिका प्रलंबित असल्याच्या कालावधीदरम्यान संबंधितांचे प्रलंबित असलेले वेतन सुरू ठेवण्याबाबत मा.उच्च न्यायालय यांनी आदेश दिले आहेत.

तथापि, सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरूध्द विधि व न्याय विभागाच्या मान्यतेने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) शालार्थ प्रणालीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

i. बनावट शालार्थ आयडी तसेच शिक्षक भरती घोटाळा रोखण्यासाठी शालार्थ प्रणालीमध्ये शालार्थ आयडी आदेश, शिक्षणाधिकारी मान्यता आदेश, संस्थेचा नियुक्ती आदेश तसेच रूजू अहवालाची प्रत ॲपलोड करणे अनिवार्य केलेले आहे.

ii. शालार्थ प्रणाली Digitalization केलेली आहे.

iii. शिक्षणाधिकारी यांचेकडून शालार्थ प्रस्ताव ई-ऑफीस मधून प्राप्त करून घेणे

iv. ई-ऑफीद्वारे शालार्थ आदेश व प्रपत्र-क देणे व त्यानुसार शालार्थ प्रणालीत नाव समाविष्ठ करणे.

v. शालार्थ प्रस्ताव प्राप्त दिनांकानिहाय निकाली काढणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे आर्थिक नुकसान झाल्याबाबत

**(४) * ७५७१ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२५ च्या वर्षअखेरीस झालेल्या अतिवृष्टीमुळे गावरान कांदयासह खरीप, लेट खरीपातील लाल कांदयाच्या पीकाचे नुकसान झाले असून निर्यातबंदी, खते, बियाणे, मशागत खर्चात झालेली वाढ, कांदा पिकाचे कीड व रोगामुळे कमी झालेले उत्पादन तसेच उत्पादित कांदयास मिळत असलेल्या अत्यल्प दरामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या बाजारातील हस्तक्षेपामुळेही राज्यातील कांदा उत्पादक यांना नुकसान सोसावे लागत असल्याने शेतकऱ्यांना थेट अनुदानाच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्याची मागणीदेखील कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पिकाचा उत्पादन खर्च २२ ते २५ रुपये प्रति किलो असताना सन २०२५ मध्ये सरासरी बाजारभाव ८ ते १८ रुपये प्रति किलो देण्यात आल्याने तसेच देशात कांद्याची पुरेशी उपलब्धता असूनही, शासनाने बफर स्टॉक तयार करण्यासाठी नाफेड आणि एनसीसीएफमार्फत तीन लाख टन कांद्याची खरेदी केली असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान आणि कर्जबाजारीपणा वाढून शेतकरी आत्महत्त्या करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सध्या कांदयाला मिळणारा दर अतिशय कमी असल्यामुळे कांदा उत्पादनाला प्रती हेक्टरी येणारा खर्च विचारात घेऊन प्रति क्विंटल किमान ३ हजार रुपयांपेक्षा अधिक दर देऊन निर्यातबंदी उठविण्याबाबत राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे वांरवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास शेतकऱ्यांचा कांदा किमान ३ हजार ५०० रुपये क्विंटल या दराने खरेदी करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याच्यादृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच सदर पिकाचे दर स्थिर ठेवण्यासाठी केलेल्या राखीव साठ्यातील कांद्याची खरेदी खुल्या बाजारात करण्याबाबत व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

कृषी विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार खरीप व लेट खरीप हंगाम कालावधीत राज्यामध्ये अतिपाऊस झाल्याने कांदा लागवड क्षेत्र मोठ्याप्रमाणात बाधित झाले असून त्याचा उत्पादनावर परिणाम झाल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरता निधी योजनेतंर्गत नाफेड व एनसीसीएफ या संस्थांच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी केला जातो. त्यानुसार नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल संस्थांमार्फत अनुक्रमे १.३७ लाख मे.टन आणि १.४० लाख मे.टन कांदा खरेदी करण्यात आला आहे. सदर कांद्याची दिल्ली, आसाम तसेच इतर राज्यांमध्ये विक्री करण्यात आली आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यासंदर्भात राज्य शासनाच्यावतीने सातत्याने केंद्रशासनाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाने दिनांक २२/०३/२०२५ च्या अधिसूचनेन्वये कांदा निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केले आहे.
(५) कांदा हे नाशवंत पीक असल्याने हमीभाव योजनेत कांदा पिकाचा समावेश करण्यात आलेला नाही. कांदा उत्पादन खर्च, कांदा लागवडीची अचूक आकडेवारी, कांदा पिकाची बाजारपेठातील मागणी, पुरवठा व्यवस्थापन, हंगामनिहाय कांदा उत्पादनाचा खर्च, कांदा उत्पादकता वाढीसाठी उपाययोजना, कांद्याची टिकवण क्षमता वाढविणे, तसेच राज्यातील कांदा पिकांचे धोरण ठरविणे व विविध उपाययोजना सुचविणे या प्रयोजनासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत मराठा उमेदवारांसाठी एसईबीसी / ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र सादर करण्याची जाचक अट रद्द करण्याबाबत

**(५) * ७१७५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.संजय खोडके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२५ च्या शिक्षक भरती प्रक्रियेत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (सीटीईटी) सादर करताना मराठा उमेदवारांना सामाजिक, शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) किंवा आर्थिक मागासवर्ग (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र सादर करावे लागणार असून सन २०२२ आणि सन २०२४ मधील भरती प्रक्रियेत शासनाने एसईबीसी किंवा ईडब्ल्यूएस असा कोणताही पर्याय दिला नसल्याने खुल्या प्रवर्गातून अर्ज भरलेले मराठा उमेदवार बेरोजगार होणार असून त्यानंतर नव्याने प्रमाणपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा लाभ नाकारला जात असल्याची बाब दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ डिसेंबर,२०२५ रोजी शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीसंदर्भात, अटी व सुचना पोर्टलवर जाहीर केल्यानुसार भरतीसाठी अर्ज करताना जे उमेदवार केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीईटी) व शिक्षक अभियोक्ता चाचणी (टेट) उत्तीर्ण आहेत अशा उमेदवारांपैकी वैध आरक्षणाचे प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार असल्याचे त्याच दरम्यान नदिर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२ मध्ये भरती प्रक्रिया सुरु झाली तेव्हा राज्य शासनाने एसईबीसी किंवा ईडब्ल्यूएस असा कोणताही पर्याय दिला नाही, त्यामुळे मराठा उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरले, सन २०२५ पर्यंत केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा, तसेच शिक्षक अभियोक्ता व बुध्दिमता चाचणी परीक्षेच्या अर्ज प्रक्रियेत मराठी उमेदवारांसाठी एसईबीसी असा स्वतंत्र प्रवर्ग अस्तित्वातच नसल्यामुळे त्यांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरले आहेत तसेच केंद्रीय स्थळावर मराठा समाजाला आरक्षण लागू नसल्याने ईडब्ल्यूएस प्रवर्गातून अर्ज केलेल्या मराठा उमेदवारांच्या सीटीईटी प्रमाणपत्रावर ५५ टक्के ते ६० टक्के दरम्यान गुण असूनही त्यांची 'अपात्र' म्हणूंन नोंद करण्यात येत असल्याने पवित्र पोर्टलवरील अर्ज प्रक्रियेत गोंधळ निर्माण झाला असल्यामुळे मराठा उमेदवार नियुक्तीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन नियमावलीमुळे सन २०२२ आणि सन २०२४ मधील शिक्षक भरती प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातून अर्ज भरणारे मराठा उमेदवार बेरोजगार राहण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे शासनाने सदरील जाचक निर्णय रद्द करण्याबाबत तसेच उमेदवारांच्या अडचणी विचारात घेतां दिनांक ८ जानेवारी, २०२६ पर्यंत दिलेली मुदतवाढ देखील अल्प असल्याने शासनाने सदर अडचणी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२), (३) व (४) इ. १ ली ते इ. ८ वी या गटातील शिक्षक पदाकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेसह शिक्षक पात्रता परीक्षा (TET)/केंद्रिय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. केंद्रिय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) करीता एसईबीसी/ईडब्ल्यूएस या प्रवर्गास ५ टक्के गुणांची सवलत केंद्र शासनाने दिलेली नाही. त्यामुळे एसईबीसी/ईडब्ल्यूएस या प्रवर्गातील उमेदवार खुला प्रवर्गातून अर्ज करतात. खुल्या प्रवर्गासाठी असलेले गुण प्राप्त होत नसल्यास ते उमेदवार Not Qualified म्हणून त्यांच्या गुणपत्रिकेत नमूद करण्यात येते. यापैकी ५५ ते ६० टक्के या दरम्यान असलेले उमेदवार Not Qualified म्हणून असले तरी राज्याच्या (TET) परीक्षेच्या अर्हतेप्रमाणे ज्या उमेदवाराकडे एसईबीसी/ईडब्ल्यूएस या प्रवर्गातील प्रमाणपत्र असेल त्यांना त्याचा लाभ घेता येईल. तथापि, शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा-२०२५ च्या वेळी आरक्षणाचे प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवारांना पुर्वी झालेल्या केंद्रिय शिक्षक पात्रता परीक्षेचे (CTET) गुण विचारात घेता येणार नाहीत. यासाठी त्या त्या केंद्रिय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) परीक्षेच्या वेळी कोणत्याही आरक्षणाचे प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवारांना सवलतीचा लाभ दिलेला आहे.

उमेदवारांना स्वप्रमाणपत्रातील योग्य त्या नोंदी सुधारित करण्यासाठी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील गर्गा, पंढरी आणि बोर्डीनाला सिंचन प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६) * ७६८९ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील गर्गा (ता.धारणी), पंढरी (ता.वरुड) आणि बोर्डीनाला (ता.चांदूरबाजार) येथील सुमारे २१२० कोटी रुपये किंमतीचे सिंचन प्रकल्प अद्याप अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झालेले नसतानाही जलसंपदा विभागाच्या दस्तऐवजांमध्ये पाणीसाठा निर्माण झालेले प्रकल्प म्हणून त्यांचा समावेश होत आहे, मात्र पंढरी प्रकल्पाच्या एकाच कालव्यातून सिंचन सुरु झाले आहे, गर्गा प्रकल्पाला अद्याप गेट बसविले गेलेले नाही, आणि बोर्डीनाला प्रकल्प अद्यापही सुरु झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील सदर अपूर्णावस्थेत असलेल्या रुपये २१२० कोटी किंमतीच्या सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे,

गर्गा मध्यम प्रकल्पाचे रुपये ७०८.१४ कोटीचे द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंजुरी प्राप्त असून प्रकल्पावर डिसेंबर-२०२५ पर्यंत रुपये ५३७.६९ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम ८०% पूर्ण झाले असून लाभक्षेत्र विकासाची कामे ९०% पूर्ण झाली आहेत. प्रकल्पाचे

उर्वरीत कामे जुन-२०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

पंढरी मध्यम प्रकल्पाचे वळण बंधारा १००%, मुख्य धरणाचे ९५% काम पूर्ण झाले असून १००% पाणीसाठा निर्मीती करण्यात आली आहे. प्रकल्पाचे लाभक्षेत्र विकासाची कामे ७०% पूर्ण झाले असून, उर्वरीत काम प्रगतीपथावर असून जुन-२०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बोर्डीनाला प्रकल्पांतर्गत मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पिय पाणीसाठा निर्मिती पूर्ण झाली आहे. लाभक्षेत्र निर्मितीचे काम प्रगतीपथावर असून जून-२०२६ पर्यंत प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्मिती करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रुपये ५१५.९६ कोटी असून मार्च-२०२५ अखेर रुपये ४५०.८४ कोटी एवढा खर्च झाला असून काम प्रगतीपथावर आहे.

(२) अंशत: खरे आहे,

पंढरी मध्यम प्रकल्पाचे धरणाचे काम पूर्ण झाले असून यावर्षी धरणामध्ये ४०% पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या डाव्या मुख्य कालव्यावरुन २ गावांचे सिंचन सुरु असून उजव्या मुख्य कालव्यावरील ७० % काम पूर्ण असून जुन-२०२७ पर्यंत कामे पूर्ण करुन सिंचन करणे नियोजित आहे.

गर्गा प्रकल्पाची घळभरणी जुन-२०२१ मध्ये पूर्ण करण्यात आले असून प्रकल्पामध्ये ८.८९ द.ल.घ.मी. (२९.९०%) पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे. प्रकल्पास १२ x ६.५ मी. चे ७ वक्रद्वार प्रस्तावित असून सदर वक्रद्वारे निर्मिती व उभारणी यांत्रिकी विभाग, नागपुर यांचेमार्फत करण्यात येत असून जुन-२०२७ पर्यंत प्रकल्पास ७ ही वक्रद्वारांची उभारणी करुन प्रकल्पामध्ये १००% पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजित आहे.

बोर्डीनाला प्रकल्पांतर्गत कोंडवर्धा धरणाची घळभरणी जून-२०१५ तसेच बोरगांव मोहना धरणाची घळभरणी जून-२०२१ अखेर झाली असून प्रकल्पांतर्गत एकूण १८.४९ दलघमी साठवण क्षमता निर्मिती झाली आहे.

(३) गर्गा प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम ८०% पूर्ण झाले आहे. प्रकल्पाची लाभक्षेत्र विकासाची कामे ९०% पूर्ण झाली असून प्रकल्पाची उर्वरीत कामे जुन-२०२७ पर्यंत पूर्ण करुन धारणी तालुक्यातील २४ गावांना सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे.

पंढरी मध्यम प्रकल्पाचे वळण बंधारा १००%, मुख्य धरणाचे ९५% काम पूर्ण झाले असून १००% पाणीसाठा निर्मीती करण्यात आली आहे. प्रकल्पाचे लाभक्षेत्र विकासाची कामे ७०% पूर्ण झाले असून, उर्वरीत कामे प्रगतीपथावर असून जुन-२०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बोर्डीनाला प्रकल्पाची जून-२०२६ पर्यंत १००% सिंचन क्षमता निर्मिती करण्याचे दृष्टीने कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत सिंचन प्रकल्पांची कामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(७) * ६७२६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत बहुतांश सिंचन प्रकल्पांची कामे निधीअभावी दीर्घकाळापासून प्रलंबित असल्यामुळे या सिंचन योजनांचे भवितव्य धोक्यात आले आहे तसेच कृष्णा खोरे महामंडळांतर्गत उरमोडी व जिहे-कठापूर (जि.सातारा) यांसारखे महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सिंचन योजनांची कामे करणाऱ्या अनेक कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची देयके अद्यापही शासनाकडे प्रलंबित असल्याने अनेक कंत्राटदारांनी कामे थांबविली असून, काही ठिकाणी केवळ किरकोळ स्वरूपाची कामे सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश प्रकल्पांना मंजूर तरतुदीच्या तुलनेत अत्यल्प निधी उपलब्ध झाल्यामुळे अनेक प्रकल्पांची कामे बंद आहेत किंवा अत्यंत संथगतीने सुरू आहेत, तसेच निधीअभावी प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे संबंधित सिंचन प्रकल्पांच्या एकूण खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत निधी अभावी प्रलंबित असलेली सिंचन प्रकल्पांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी तसेच कंत्राटदारांची थकीत देयके अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महामंडळातील सिंचन योजनांना त्यांच्या प्रगतीनुसार निधी प्राप्त होत आहे. महामंडळाकडे सुरु असलेले उरमोडी व जिहे कठापूर हे दोन्ही प्रकल्प निधी अभावी प्रलंबित नाहीत. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात डिसेंबर-२०२५ अखेरपर्यंत जिहे कठापूर योजनेस रुपये १४८.९९१० कोटी निधी वितरित करण्यात आला असून यातून प्रलंबित दायित्व अदा करण्यात आले आहे.माहे डिसेंबर, २०२५ अखेर जिहे कठापूर योजनेचे केवळ रुपये १६.६८ कोटी रकमेचे दायित्व महामंडळ स्तरावर प्रलंबित होते. माहे डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत उरमोडी प्रकल्पाचे कोणतेही दायित्व प्रलंबित नव्हते.
(२) व (३) जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांची कामे पावसाळा कालावधीत बंद अथवा संथ गतीने सुरु असतात. प्रत्येक आर्थिक वर्षात पावसाळ्यापुर्वी अथवा पावसाळ्यानंतर कामाचे प्रमाणात निधी आवश्यक असतो.जलसंपदा विभागाने सर्व महामंडळांसाठी कार्यक्रम घटकाखाली (डिसेंबर, २०२५ अधिवेशन पुरवणी वगळता) तरतूद रुपये १९१०२.०७३६ कोटी असून त्यापैकी रुपये १०५७६.९३०३ कोटी निधी डिसेंबर, २०२५ अखेर वितरित झाला आहे. उर्वरित निधी मागणीचे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर आहेत. कंत्राटदारांना निधी देण्याबाबत विभागाचा सकारात्मक पाठपुरावा सुरु आहे.
(४) कृष्णा खोरे महामंडळाच्या मंजूर एकूण रुपये ३८०२.५६४९ कोटी तरतूदीपैकी रुपये १८२५.५४७६ कोटी निधी माहे डिसेंबर, २०२५ अखेर वितरित करण्यात आला आहे. वित्त विभागाने निश्चित केलेल्या प्रमाणात निधी प्राप्त होत असून प्राप्त निधीतून प्रकल्पाची कामे योग्य गतीने सुरु आहेत. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास मंजूर तरतुदीतून प्रकल्पांची भौतिक प्रगती व प्रलंबित देयके याआधारे निधी वितरण करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी अनुदानित शैक्षणिक संस्थांनी भरती केलेल्या शिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता देण्याबाबत

**(८) * ७३६४ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्यातील काही खाजगी अनुदानित शैक्षणिक संस्थांनी शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार जाहिरात प्रसिध्द करून शिक्षकांची रिक्त पदे भरलेली असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त्यांना शासनाकडून मान्यता न देण्यात आल्यामुळे संबंधित संस्था व नियुक्त शिक्षकांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांपैकी काही याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त शिक्षकांच्या बाजूने निकाल दिले असून त्यानुसार शासनास मान्यता देण्याचे निर्देश दिले असूनही न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या शिक्षकांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) शासन अधिसूचना दिनांक २२ जून, २०१७ तसेच शासन निर्णय, दिनांक २३ जून, २०१७ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची भरती प्रक्रिया पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, काही मोजक्या शैक्षणिक संस्थांनी शिक्षकांची रिक्त पदे त्यांच्या स्तरावर भरली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) खाजगी संस्थांमधील शिक्षक भरती ही पवित्र पोर्टलमार्फत नियुक्त करणेबाबतचे शासनाचे धोरण विहीत असताना विशिष्ट कालावधीत पवित्र पोर्टल कार्यान्वित नव्हते या कारणावरुन काही प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने शिक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देण्याचे आदेश दिले आहेत. अशा प्रकारचा मूळ आदेश ज्या प्रकरणात पारीत झाला होता, त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.१०५४९/२०२५ मध्ये दिनांक ०७/१०/२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे अशा स्वरुपाच्या उर्वरीत प्रकरणात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्यास सहमती दर्शविण्याबाबतचा प्रस्ताव विधि व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात अशा याचिका शासनाच्यावतीने लवकरच दाखल करण्याचे नियोजित आहे. सबब, सदर नियुक्त्या शासन धोरणाशी विसंगत असल्याने त्यास मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) धरणाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याबाबत

**(९) * ७००४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या आणि शहराच्या सुरक्षेशी थेट संबंध असलेल्या खडकवासला धरणाची सुरक्षितता धोक्यात आली असून धरणाच्या दगडी भिंतींवर गेल्या काही वर्षांपासून झाडे, झुडपे आणि वेली वाढत असून, त्यांची नियमित साफसफाई, तांत्रिक तपासणी आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाच्या भिंतीमध्ये उगवलेल्या झाडांच्या मुळांमुळे दगडांच्या सांध्यांमध्ये दाब निर्माण होतो आणि कालांतराने भेगा वाढतात, धरणातील जलपातळी वाढली की भिंतीवरचा भार अनेक पटींनी वाढतो आणि वनस्पतींमुळे तयार झालेल्या कमकुवत भागांवर धोका निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खडकवाला धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाच्या दगडी भिंतींवरील झाडे, झुडपे आणि वेली यांची नियमित साफसफाई, तांत्रिक तपासणी आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

खडकवासला धरणाच्या दगडी भिंतींवर लहान झाडे, झुडपे आणि वेली वाढलेल्या असून सन २०२५ मध्ये आवश्यक निधी मंजूर करण्यात आलेला असून क्षेत्रिय स्तरावर धरणाच्या भिंतीवरील झाडे, झुडपे आणि वेली तातडीने काढण्याची कार्यवाही प्रगतीत असून धरणाची सुरक्षा धोक्यात आलेली नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

मोठ्या झाडांच्या मुळांमुळे दगडांच्या सांध्यांमध्ये दाब निर्माण होतो आणि कालांतराने भेगा वाढतात. परंतु लहान झाडे, झुडपे आणि वेली या वनस्पतींमुळे धरणाच्या भिंतीवरील भेगा वाढत नाहीत.
(३) खडकवासला धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दरवर्षी नियमित परिचालन व परिरक्षण कामे सिंचन/ बिगर सिंचन प्रापणसूची अंतर्गत करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(१०) * ७०१७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या विविध योजनांमधून शिष्यवृत्ती देण्यात येते, मात्र गेल्या पाच वर्षांमध्ये सुमारे १ लाख ४२ हजार ३८३ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च शिक्षण संचालनालयाच्या महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून विविध १४ शिष्यवृत्ती योजनांकरीता गेल्या ५ वर्षात अर्ज केलेल्या ९ लाख ६९ हजार २९ विद्यार्थ्यांपैकी १ लाख ४२ हजार ३८३ विद्यार्थी अद्यापि शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याने शिष्यवृत्तीवर अवलंबून असलेल्या विद्यार्थ्यांना

शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागणार असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची संख्या महाविद्यालय स्तरावर जवळपास ७५,२०३ एवढी असून असून थेट उच्च शिक्षण विभागाच्या मंजुरीच्या प्रतिक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची संख्या ६७,१८० असून शिष्यवृत्ती वितरणासाठी आवश्यक निधी असूनही अर्ज पडताळणी, तांत्रिक अडचणी, प्रशासकीय विलंब किंवा समन्वयाअभावी शिष्यवृत्ती वितरण प्रक्रिया रखडल्यामुळे शासकीय निधीचा प्रभावी वापर होत नसल्याने अप्रत्यक्षपणे निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीवर अवलंबून असलेले विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत याकरीता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शिष्यवृत्तींचे १,४२,३८३ एवढे मागील ५ वर्षातील अर्ज पडताळणी अभावी प्रलंबित असल्याचे दैनिक वर्तमानपत्रांमधील बातम्यांद्वारे माहे, डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले होते.

(२), (३) व (४) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त राज्य शासन पुरस्कृत १४ शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी पोर्टलमार्फत ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्याने संगणकीय प्रणालीवर अर्ज सादर केल्यानंतर संस्थास्तरावर आणि विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे स्तरावर या अर्जांची पडताळणी करण्यात येते.

शिष्यवृत्तीच्या अर्जासह विद्यार्थी आवश्यक कागदपत्रे जोडत नाहीत, विद्याथी अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयास सादर करत नाहीत, विद्यार्थ्याने अचूक कागदपत्रे सादर न करणे इ. कारणांमुळे शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीअभावी प्रलंबित राहतात.

माहे डिसेंबर, २०२५ मध्ये शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आल्यावर उच्च शिक्षण संचालक यांचे स्तरावरून त्यांचे परिपत्रक दिनांक १५/०९/२०२५, दिनांक ३०/१०/२०२५, दिनांक ३०/१२/२०२५ व दिनांक ११/०२/२०२६ अन्वये प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज तातडीने पडताळणी करणेबाबतच्या सूचना सर्व विभागीय सहसंचालक यांना देण्यात आल्या. तसेच वेळोवेळी ऑनलाईन बैठका घेऊन प्रलंबित शिष्यवृत्तींचे अर्ज पडताळणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

उपरोक्त सूचना दिल्यानंतर प्रलंबित १,४२, ३८३ अर्जांपैकी ४९,०५७ अर्जांवर कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. दिनांक २७/०२/२०२६ रोजीच्या डीबीटी पोर्टल अहवालानुसार ९३,३२६ अर्ज पडताळणी अभावी प्रलंबित असून यामध्ये सन २०२५-२६ या चालू वर्षातील अर्जांची संख्या ८१,७५३ एवढी असून त्यापूर्वीच्या मागील ४ वर्षातील प्रलंबित अर्जांची संख्या ११,५७३ एवढी आहे. या सर्व प्रलंबित अर्जांची जलदगतीने पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

दिनांक २७/०२/२०२६ रोजीच्या महाडीबीटी पोर्टलवरील अहवालानुसार अर्जांची सद्य:स्थितीचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अर्ज केलेले विद्यार्थी | लाभार्थी विद्यार्थी | संस्थास्तरावर प्रलंबित अर्ज | विभागस्तरावर प्रलबित अर्ज | शिष्यवृत्ती निधी वितरण (रुपये हजारात) |
|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | १८३३३६ | १७४४२१ | ६०५ | ७५ | ११७३३३९ |
| २०२२-२३ | १७७२१८ | १६९१७१ | १३४९ | ५४ | १३८८३६४ |
| २०२३-२४ | १८१८४१ | १७३८०३ | १५२५ | १९८ | १६५७२९१ |
| २०२४-२५ | २२६५९९ | २०८२६० | ४९४३ | २८१३ | २४०१४०५ |
| २०२५-२६ | १९९६०० | ५४८३६ | ३१८१४ | ४९९३९ | ४६३७५७ |
| **एकूण** | **९६८५९७** | **७८०४९५** | **४०२४१** | **५३०८५** | **७०८४१६३** |

उपरोक्त विवरणपत्रात दर्शविल्यानुसार मागील ५ वर्षात प्राप्त ९६८५९७ प्राप्त अर्जांपैकी ७८०४९५ एवढ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून यासाठी रुपये ७०८.४१ कोटी एवढा निधी वितरीत केला आहे. त्यानुसार शिष्यवृत्ती निधीचा विद्यार्थ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने प्रभावी वापर करण्यात येत आहे. तसेच शिष्यवृत्ती अभावी विद्यार्थ्याला शिक्षण अर्धवट सोडावे लागल्याची तक्रार प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील बोदवड उपसा सिंचन प्रकल्पाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(११) * ७७०१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील ५० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राला सिंचनाचा लाभ देणाऱ्या ‘बोदवड उपसा सिंचन’ प्रकल्पाचे काम निधी अभावी अपूर्ण असल्याने सदर योजनेकरीता सन २०१९ मध्ये कोट्यवधीं रुपयांची खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री अद्यापही वापराविना पडून असल्याने देखभाल दुरुस्तीचा अनावश्यक खर्च होवून शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याचे तसेच सदर प्रकल्पाचा खर्च आता ६ हजार कोटी रुपयांवर पोहोचला असल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पाइपलाईनचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामासाठी निधीची कमतरता भासत आहे, हे ही खरे आहे

(३) असल्यास, बोदवड उपसा सिंचन योजनेचे काम सत्वर पूर्ण करून यंत्र सामग्री उपयोगात आणण्यासंदर्भात सदर प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेचे काम सुरू करण्यास शासन निर्णय दिनांक ०३/०१/२०१७ अन्वये मान्यता प्रदान केली. सन २०१७ च्या आधी निधी अभावी व वैधानिक मान्यतेअभावी प्रकल्पाचे

काम बंद स्थितीत होते. सद्य:स्थितीत योजनेच्या टप्पा-१ अंतर्गत जुनोने माती धरणाचे काम ८५%, पंपगृह-१ चे काम ९०%, पंपगृह-२ चे काम ९०% व उध्दरण नलिकेचे काम ६२% पूर्ण झालेले आहे. तसेच पंपगृह-१ व २ मधील यंत्रसामुग्री बसविण्याचे काम ६०% पूर्ण झालेले असून उर्वरित कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पावर माहे जानेवारी-२०२६ अखेर रुपये २०५९.८१ कोटी एवढा खर्च झालेला असून प्रकल्पाचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

त्यामुळे यंत्रसामुग्री वापरा विना पडून असल्याने देखभाल व दुरुस्तीचा अनावश्यक खर्च होवून शासनाच्या निधीचा अपव्यय होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) व (३) बोदवड उपसा सिंचन प्रणाली अंतर्गत उध्दरण नलिकेची एकूण लांबी ११.८७० कि.मी असून सुमारे ७.२८ कि.मी लांबीतील (६२%) पाईपांचे Laying पूर्ण झालेले आहे. उर्वरित पाईप अंथरण्याची कामे शेतकऱ्यांशी चर्चा करुन सहमतीने पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सदर प्रकल्पासाठी सन २०२५-२६ मध्ये रुपये ५०० कोटीची तरतूद केलेली आहे. प्रकल्पाचा समावेश प्रधामंत्री कृषी सिंचन योजनेत (PMKSY) करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीच्या खात्यामध्ये शासन हिस्सा नियमित जमा करणेबाबत

**(१२) * ६८१४ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू असून, कर्मचाऱ्यांचा हिस्सा नियमित कपात केला जात असला तरी शासनाचा हिस्सा संबंधित कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यामध्ये नियमितपणे जमा केला जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा व अमरावती या जिल्ह्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यामध्ये कर्मचाऱ्यांचा व शासनाचा हिस्सा नियमितपणे जमा होत नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा हिस्सा व शासनाचा हिस्सा NPS खात्यामध्ये जमा करून सदर रक्कम विविध शेअर बाजाराधारित योजनांमध्ये गुंतविली जाते व त्यावर मिळणारा परतावा संबंधित कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्यावेळी अथवा नियमानुसार मिळतो तसेच शेअर बाजारातील चढ-उतार दैनंदिन स्वरूपाचे असल्यामुळे कर्मचाऱ्यांचा व शासनाचा हिस्सा वेळेवर NPS खात्यामध्ये जमा न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विभागनिहाय अथवा जिल्हानिहाय आढावा घेऊन संबंधित कोषागार, आहरण व संवितरण अधिकारी, शिक्षणाधिकारी अथवा इतर जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन भविष्यात अशा प्रकारची अनियमितता टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या हिस्स्यासोबतच शासनाचा हिस्सा नियमित व वेळेत NPS खात्यामध्ये जमा करण्याबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी सादर केलेल्या अहवालानूसार अमरावती विभागाअंतर्गत अकोला, वाशिम, बुलढाणा व अमरावती यामधील राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली लागु असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा हिस्सा नियमित कपात केला जात असून शासनाचा हिस्सा संबंधीत कर्मचाऱ्यांच्या एनपीएस खात्यामध्ये नियमीतपणे जमा करण्यात येत आहे. तथापि, यवतमाळ येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा व शासनाचा हिस्सा तांत्रिक कारणास्तव नियमितपणे भरण्यास अडचणी आल्या होत्या.
(४) व (५) या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक) यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, यवतमाळ जिल्हयातील एनपीएस च्या रकमा विहित खात्यात जमा होणेस आलेल्या तांत्रिक अडचणीबाबत संबंधित वेतन पथक अधिक्षक (माध्यमिक) यवतमाळ यांनी तक्रार तिकीट ऑनलाईन शालार्थ प्रणालीवर नोंदविल्या आहेत. तथापि, आलेल्या तांत्रिक अडचणीचे महाआयटीकडून वेळेत निराकरण न झाल्यामुळे एनपीएस वजावटी जमा होण्यास अडचणी आलेल्या आहेत. प्राप्तस्थितीत या संदर्भात महाआयटीला सूचना देऊन ही अडचण दूर करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी वेतनपथक अधिक्षक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यवतमाळ यांनी महाआयटीशी प्रत्यक्ष संपर्क करुन तांत्रिक अडचण वेळेत सोडवून घेणे आवश्यक होते. प्राप्त स्थितीत वेतन पथक अधिक्षक यांनी सदरील रक्कम बँक खात्यावर जमा केली आहे.

-----------------

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी निधीची अपुरी तरतूद केल्याबाबत

**(१३) * ७१३२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सचिन अहिर, डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना सन २०१७ मध्ये जाहीर करण्यात आली असून, या योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांपैकी सुमारे ६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना अद्याप लाभ देण्यात आलेला नाही, त्यामुळे सदर शेतकरी अद्यापही कर्जमाफीपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी एकूण रुपये ५,९७५ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता असतानाही शासनाने सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांमध्ये केवळ रुपये ५०० कोटीं रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली असल्याने अपुऱ्या निधीमुळे अनेक पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होण्यास अडथळा निर्माण होत असून, सन २०१७ पासून इतका दीर्घ कालावधी उलटूनही लाभ न मिळाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांमध्ये कर्जबाजारीपणा, शेतकरी आत्महत्या, आर्थिक अस्थिरता व सामाजिक तणाव वाढत असल्यामुळे शेतकरी कल्याणासाठी असलेल्या इतर शासकीय योजनांच्या उद्दिष्टांवरही प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ६ लाख ५६ हजार प्रलंबित लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी सुमारे रुपये ५,९७५.५१ कोटी निधीची आवश्यकता असतानाही सदर निधीची तरतूद न होण्यामागील कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने या सर्व शेतकऱ्यांना उर्वरित निधी उपलब्ध करुन ठराविक कालमर्यादेत कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) नाही.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ ही योजना २८/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलात आली आहे. लाभास पात्र असलेल्या ५०.६० लाख शेतकऱ्यांपैकी ४४.०४ लाख शेतकऱ्यांना रुपये १८,७६२ कोटी इतक्या रक्कमेचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे. सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या उर्वरित ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने योजनेची संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी शासनाने दिनांक ०३/१२/२०२५ रोजी मान्यता दिली आहे. तसेच या योजनेकरीता सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये वित्त विभागाकडून पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला रुपये ५०० कोटी निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजनेंतर्गत उर्वरित शेतकऱ्यांना लाभ आदा करण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेकरीता रुपये ५९७५.५१ कोटी नियतव्ययाची मागणी नियोजन व वित्त विभागास करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१४) * ७२३३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सदाशिव खोत:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ५,५०० शाळांमध्ये आजही वीज, पिण्याचे पाणी, शौचालये व वर्गखोल्या यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत तसेच जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक शाळांनी महावितरणची देयके न भरण्याची संख्या वाढली असून २०० हून अधिक शाळांनी विजेचे देयक न भरल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण अंधारात सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून शाळांना मिळणारे अनुदान कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात महावितरणची देयके थकीत राहत असून, युडायस प्लस (UDISE+) अहवालानुसार अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, वीज व इतर आवश्यक सुविधा अपुऱ्या असल्याचे स्पष्ट झाले आहे, तसेच जवळपास ३३२८ शाळांमध्ये वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होत असून यामध्ये नंदुरबार, गडचिरोली, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, धुळे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व जालना या जिल्ह्यातील शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीज व इतर मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या शाळांमध्ये उक्त सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत तसेच जिल्हा परिषद शाळेचे विजेचे देयक भरण्याबाबत अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राज्यातील काही शाळांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे नियमित व थकीत विद्युत देयके भरण्यासाठी रुपये १८.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांची विद्युत देयके वेळेवर अदा करण्यासाठी संयुक्त बिलिंग (Composite Billing) पध्दतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण ६४४७९ शाळांपैकी ६४४६२ शाळांमध्ये विद्युत सुविधा, ६४४७९ शाळांमध्ये पिण्याची पाण्याची सुविधा, ६३०७५ शाळांमध्ये मुलींचे स्वच्छतागृह (मुलांच्या शाळा वगळून), ६१९९८ शाळांमध्ये मुलांचे स्वच्छतागृह (मुलींचे शाळा वगळून), ६४४७९ शाळा इमारती, ५४७३७ शाळांमध्ये खेळाचे मैदान, ६३३५९ शाळांमध्ये दिव्यांगासाठी रॅम्प शाळांमध्ये उपलब्ध आहेत.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सीएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांव्दारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये क्रीडा/कला शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत

**(१५)** * **६७४२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला व क्रीडा विषयांना इतर शैक्षणिक विषयांप्रमाणेच समान महत्त्व देण्यात आले असून, शासनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर मात्र याची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने राष्ट्रीय व राज्यस्तरावर दर्जेदार खेळाडू घडवावयाचे असल्यास शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना शिस्तबध्द क्रीडा प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित शाळांमध्ये ५०० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्येच क्रीडा/कला शिक्षकांची नेमणूक केली जाते, मात्र ४९९ किंवा

त्यापेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची नेमणूक न केल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षण व प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन क्रीडा मंत्री महोदयांनी दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे क्रीडा शिक्षकांचा आकृतीबंध व संच मान्यता मंजूर करून क्रीडा शिक्षकांची भरती करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांवर शिस्तबध्द प्रशिक्षण, मैदानी सुविधा आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी क्रीडा शिक्षकांची तात्काळ भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील तरतूदींशी सुसंगती असावी म्हणून दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कला व क्रीडा विषयांच्या शिक्षकांचा संच मान्यतेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे ही पदे भरण्यास कोणतीही अडचण नाही.
(२), (३) व (४) शासन निर्णय, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित माध्यमिक शाळांसाठी इयत्ता १ ली ते १० वी च्या २५१ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमागे ०१ विशेष शिक्षक (क्रीडा) व इयत्ता ८ वी ते १० वी च्या १५१ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमागे ०१ विशेष शिक्षक (क्रीडा) पद अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच त्यापुढे विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात क्रीडा शिक्षकांची पदे अनुज्ञेय करण्याची तरतूद उक्त शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे.

संच मान्यतेत कला व क्रीडा विषयांचा समावेश झाल्याने शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ मध्ये प्राप्त गुणांच्या आधारे या पदांवर भरती होणार आहे. यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी संचमान्यतेनुसार उपलब्ध होणाऱ्या पदांची जाहिरात पवित्र पोर्टलवर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

दिनांक ०२/०१/२०२६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेअंतर्गत प्रत्येक केंद्रस्तरावर ०१ याप्रमाणे राज्यात क्रीडा या संवर्गातील ४८६० पदांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आला आहे. मूळ मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत ही पदे असल्याने ती भरण्यासाठी आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे. केंद्रस्तरीय शाळेसाठी ०१ क्रीडा शिक्षक नियुक्ती करण्यात येणार असल्याने त्यांची सेवा इतर सर्व शाळांना उपलब्ध होणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय कापूस खरेदी केंद्रांच्या कामकाजात अनियमितता होत असल्याबाबत

**(१६) * ७०९८ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सत्यजीत तांबे, श्री.संजय केणेकर:** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेवगाव (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील बालमटाकळी येथील शासकीय कापूस खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता खरेदी सुरू करण्यात आली असून, श्रीरामपूर तालुक्यातील

महांकाळ वाडगाव येथील शासकीय कापूस खरेदी केंद्रात विक्रीसाठी आणलेला कापूस माल ग्रेडचे कारण देऊन नाकारला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेत व्यापाऱ्यांचा हस्तक्षेप वाढत असल्याने ऑनलाईन नोंदणी पध्दतीचा लाभ शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांना मिळत असून, ठराविक वाहनांतूनच मोठ्या प्रमाणात कापूस विक्री होत असल्याचे दिसून आले असून कापूस माल ग्रेडचे कारण देऊन नाकारण्यात आलेला कापूस पुन्हा शासकीय खरेदी केंद्रावर एमएसपीच्यां हमीभावाने विक्री करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक समस्या निर्माण होऊन शासकीय यंत्रणेच्या या नियोजनशून्य कामकाजामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापूस खरेदी केंद्र चालक व सीसीआयचे ग्रेडर हे संगनमताने शेतकऱ्यांची अडवणूक करत प्रती क्विंटल ८०० ते १००० रुपयांची लूट करित असल्याने प्रत्यक्षात शासकीय कापूस खरेदी केंद्रांचा लाभ व्यापाऱ्यांना मिळत असल्याने शासकीय निधीचा एकप्रकारे अपव्यय होत आहे, तसेच केंद्र निवडीपासून ते कापूस मोजणीपर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने कापूस खरेदी केंद्र चालक व सीसीआयचे ग्रेडर हे संगनमताने शेतकऱ्यांची अडवणूक करुन प्रती क्विंटल ८०० ते १००० रुपयांची लूट करित असून उक्त संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच शासकीय कापूस खरेदी केंद्रावर केंद्र निवडीपासून ते कापूस मोजणीपर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.) मार्फत स्थानिक प्रशासन, वर्तमानपत्रे, समाजिक माध्यमे आणि संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीशी समन्वय साधून किमान आधारभूत किंमत खरेदी प्रक्रिया सुरू करण्याबाबत, खरेदी केंद्रांची ठिकाणे आणि संबंधित प्रक्रियांबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात आली आहे.

बालमटाकळी, ता.शेवगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे कापूस हंगाम २०२५-२०२६ करीता किमान आधारभूत किंमत खरेदीची आगाऊ सूचना वृत्तपत्र जाहिराती, स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी माध्यमाद्वारे प्रसारित करण्यात आली असून या कापूस खरेदी केंद्रावर जिनिंग-फॅक्टरीचा शुभारंभ झाल्याची बातमी दिनांक २४/१२/२०२५ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रात देण्यात आली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळ वाडगाव खरेदी केंद्रावर कोणत्याही शेतकऱ्याकडून सी.सी.आय.ला व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाला एम.एस.पी. ने कापूस खरेदीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून कापूस खरेदीचे काम सुरळीतपणे सुरू असून दिनांक १३/०२/२०२६ पर्यंत एकूण ५,१०२ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी सी.सी.आय. ने ‘कपास किसान’ ॲपद्वारे कापूस खरेदी प्रक्रिया डिजिटल केली आहे. शेतकरी ‘कपास किसान’ ॲपद्वारे स्व-नोंदणी आणि स्लॉट बुकिंग करतात. सर्व

नोंदणीकृत शेतकऱ्यांची पडताळणी आणि प्रमाणीकरण कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत करण्यात येते.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या एम.एस.पी. मार्गदर्शक तत्त्वांनुसार कापूस खरेदी ही नोंदणीकृत व प्रमाणीकरण झालेले शेतकऱ्यांकडून नियोजित स्लॉटनुसार काटेकोरपणे केली जात आहे. नोंदणीकृत आणि पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांचा एम.एस.पी. गुणवत्ता मानकाचा कापूस सी.सी.आय. खरेदी करते.

स्लॉट बुक न केलेल्या किंवा ज्यांचा कापूस एम.एस.पी. गुणवत्ता मापदंडांची पूर्तता करत नाही अशा शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात नाही. एम.एस.पी. मानकांशी सुसंगत नसल्यामुळे नाकारलेला कापूस एम.एस.पी. दराने पुन्हा खरेदी करता येत नाही. अशा प्रकारे नाकारलेल्या कापसाची पुनर्विक्री करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

सी.सी.आय. ने कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्व-नोंदणीसाठी, सोयीसाठी आणि खरेदी प्रक्रीयेत पारदर्शकता आणण्यासाठी ‘कपास किसान’ या मोबाईल ॲपद्वारे किमान आधारभूत दराने कापूस खरेदी सुरू केली आहे. या ॲपद्वारे शेतकरी त्यांच्या आधार क्रमांकाचा वापर करून स्वतःची नोंदणी करतात आणि कापसाच्या लागवडीखालील क्षेत्रासह त्यांच्या जमिनीच्या नोंदींची माहिती सादर करतात. सदरची माहिती सादर केल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत माहितीची पडताळणी करून मंजुरी दिली जाते. अशा मंजुरीनंतरच नोंदणी अंतिम केली जाते व तदनंतर शेतकरी सी.सी.आय.ला कापूस विकू शकतात. कपास किसान ॲपवर दिनांक ०१/०९/२०२५ पासून ते दिनांक १६/०१/२०२६ पर्यंत शेतकऱ्यांची स्व-नोंदणी करण्यात आली. राज्यात एकूण ७.२० लाख शेतकऱ्यांनी कपास किसान या मोबाईल ॲपद्वारे यशस्वीरित्या स्व-नोंदणी केली असून स्लॉट बुकिंग आणि कापूस खरेदी सुरळीतपणे सुरू आहे.

तसेच, कोणत्याही शेतकऱ्याकडून सी.सी.आय.ला व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाला एम.एस.पी. ने कापूस खरेदीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

अशा प्रकारे, कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी ‘कपास किसान’ या मोबाईल ॲपद्वारे शासकीय कापूस खरेदी केंद्रावर केंद्र निवडीपासून ते कापूस मोजणीपर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) * ६६१९ श्री.सुनिल शिंदे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ आदिवासीबहुल जिल्ह्यांतील अनुसूचित (पेसा) क्षेत्रात अनुसूचित जमातीच्या शिक्षकांची १७ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याची माहिती शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रधान सचिव यांना शिक्षण आयुक्त (पुणे) यांनी दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी पाठविलेल्या पत्रातून कळविले असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेसा क्षेत्रातील आदिवासी शिक्षकांची १७ हजार ३३ पदे रिक्त असतानाही अद्यापपर्यंत पदभरती करण्यात आली नसल्यामुळे तात्पुरत्या, मानधनावर किंवा अतिरिक्त कार्यभारावर शिक्षण दिले जात आहे, तसेच सदर रिक्त पदांमुळे अमरावती, नाशिक, ठाणे, पालघर, नंदुरबार, गडचिरोली, चंद्रपूर, पुणे,

अहिल्यानगर आदी आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता घसरत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेसा क्षेत्रातील आदिवासी शिक्षकांची सर्व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी मागणी 'ट्रायबल फोरम' या संघटनेने पुणे येथील शिक्षण आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पेसा क्षेत्रातील शिक्षकांची सर्व रिक्त पदे वेळेत भरण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच गत पाच वर्षांपासून सुरु असलेल्या भरती प्रक्रियेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांची पदभरती "शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी" मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीद्वारे केली जाते. पेसा क्षेत्रातील आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुज्ञा याचिका क्र.२२१०९/२०२३ दाखल असल्याने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीच्या कार्यवाहीस सामान्य प्रशासन विभाग यांचेकडून स्थगिती देण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पात्र उमेदवार, अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवार यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याचे निर्देश दिनांक १५ जुलै, २०२४ नुसार देण्यात आले आहेत. उक्त विशेष अनुज्ञा याचिका प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ अन्वये पेसा क्षेत्रातील पदभरतीस सुधारित आरक्षण प्रमाण निश्चित करुन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पेसा क्षेत्रातील या विभागाशी संबंधित पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक संवर्गाच्या पदभरती संदर्भात पुढील कार्यवाही करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांनी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवेगाव बांध (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) येथील माजी मालगुजारी तलावातून गाळ काढण्याच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(१८) * ६६२९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवेगाव बांध (ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) येथील माजी मालगुजारी तलावातून शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी सदर तलावातून गाळ काढण्याचे सुरू असलेले काम नियमानुसार होत नसल्याने या परिसरातील ३२ गावांना सिंचनाचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम प्रत्यक्षात अपूर्ण असतानाही कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आले असून काही ठिकाणी अपुरी खोली व अंदाजपत्रकाप्रमाणे ठरवून दिलेल्या ठराविक लांबीचे काम पूर्ण केले नसल्याच्या व चुकीच्या पध्दतीने तलावातील गाळ काढण्यात आल्याने मंजूर निधीचा अपव्यय झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवेगाव बांध तालुक्यातील संबंधित ३२ गावांतील शेतकऱ्यांना सदर अनियमित कामांमुळे अपेक्षित पाणीपुरवठा न झाल्याने शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला असून नवेगाव बांध येथील कालव्यांतून गाळ काढण्याच्या कामाची संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी व मोजणी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवेगावबांध येथील सदर कामातील दोषी ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात गोंदिया जिल्ह्यातील तलावांतील गाळ काढण्याची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

सदर काम नाम फाऊंडेशन या सामाजिक संस्थेद्वारे करण्यात आले आहे. सदर कामाची किंमत रुपये ३६.०८ लक्ष असताना देखील सदरहु काम रुपये १८.४३ लक्ष मध्ये पूर्ण करून कामामध्ये बचत करण्यात आली आहे. काम झाल्यानंतर उन्हाळी हंगामातील ९५० हे. क्षेत्रावर सिंचन सुरळीत सुरू आहे. या कामाविषयी पाणीवापर संस्था नवेगाव, देवलगाव, बिडटोला यांनी समाधान व्यक्त केले आहे.
(२) हे खरे नाही.

अशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. काम तांत्रिकदृष्ट्या योग्य रितीने क्षेत्रिय स्तरावर पूर्ण करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.

सदर गाळ काढण्याचे काम झाल्याने उन्हाळी हंगामात ९५० हे. क्षेत्रावर सिंचन सुरळीत सुरु आहे.

तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष झालेल्या कामाची मोजमाप व तपासणी केल्यामुळे सदरहु कामांमध्ये बचत झालेली आहे.
(४) कामाबाबत तक्रार प्राप्त नसल्याने व सदरहु काम नाम फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेव्दारे गुणवत्तापुर्वक केल्याने सदर कामाची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांची पेरणी ते शेतमाल विक्रीकरीता मार्गदर्शन आणि समन्वयासाठी कृती दल स्थापन करण्याबाबत

**(१९)** * **६९४४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पिकांची पेरणी ते शेतमाल विक्री ही प्रक्रिया अधिक समन्वयान्वये सुलभतेने पार पाडण्यासाठी कृषी व पणन विभागाच्या संयुक्त कृती दलाची स्थापना करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना पेरणी ते विक्रीपर्यंत मार्गदर्शन मिळावे यासाठी "पीक काढणी" मार्गदर्शन अधिकारी नेमण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले असून अशा अधिकाऱ्यांची निवड, कार्यशैली व कार्यक्षेत्र निश्चित करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतीमाल विक्री व उत्पन्नात निश्चित वाढ करण्याच्या दृष्टीने सदर कृती दलाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरण अंतर्गत पवनी व लाखांदूर तालुक्यातील कालव्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) * ७७०९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द धरणांतर्गत पवनी व लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन १९९७-९८ मध्ये डावा मुख्य कालवा व उप कालव्याच्या बांधकामास सुरुवात झाली, मात्र २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्यापही कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने दरवर्षी पावसाळ्यात या कालव्यामध्ये साचणारे पाणी चौरास क्षेत्रातील हजारो हेक्टर शेत जमिनीत शिरून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यातील हेच पाणी गावातील नाल्यामध्ये साचल्यामुळे स्थानिक पातळीवर पुरस्थिती निर्माण होत असून, दरवर्षी ढोलसर, विरली (बु.), ओपारा, पाहूणगांव, भागडी, कुडेगांव, रोहणी, किरमटी, परसोडी (नाग), सावरगांव, गवराळा, खैरीपट अशा अनेक गावांमध्ये गेल्या काही वर्षांपासून वारंवार पुरस्थिती निर्माण होऊन पिकांचे तसेच गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील पवनी व लाखांदूर तालुक्यातील सुमारे १९ हजार हेक्टर क्षेत्राला कायमस्वरुपी सिंचन सुविधा मिळवून देण्यासाठी डावा मुख्य कालवा व सर्व उप कालव्यांची अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

गोसीखुर्द धरण अंतर्गत पवनी व लाखांदुर (जि.भंडारा) तालुक्यातील भाग हा गोसीखुर्द डावा

कालव्याच्या लाभक्षेत्रात येतो. सदर डावा कालव्यांतर्गत डावा मुख्य कालवा, शाखा कालवा १,२,३ व त्यावरील वितरिका व लघु कालवे, वितरण प्रणाली अंतर्भुत आहेत. सर्व वितरण प्रणालीची एकूण लांबी ३५७ किमी असून, त्यावर एकूण २८९४२ हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली.

डावा कालव्या वरील वितरण प्रणालीचे ९९ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. तसेच सद्य:स्थितीत खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामाकरीता शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. डावा कालव्यांतर्गत असलेले बहुतांश लाभक्षेत्र हे चौरास पट्टा असल्याने बहुतांश भागात पावसाचे पाणी निचरा करणारे नाले /बोडी हे उथळ असून बऱ्याच ठिकाणी नाले हे बुजलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे पावसाळयातील पाणी संबंधित लाभक्षेत्रातून (चौरास पट्टयातून) निचरा होण्यास विलंब होतो.

पावसाळयादरम्यान कालवा प्रणालीत आलेल्या पाण्याचा निचरा करण्याकरीता कालव्याच्या पुच्छ भागात Tailing ची कामे बऱ्याच ठिकाणी पूर्ण करुन जवळच्या नाल्याला जोडण्यात आले आहे. तसेच नविन कामे प्रस्तावित करण्यात आली असून, कामे प्रगतीपथावर आहेत.

चौरास पट्टयात असलेले नाले /बोडी यांची खोलीकरण व रुंदीकरण करणे अत्यावश्यक असून, सदर बाब जलसंपदा विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नसून, जलसंधारण व महसूल विभागासोबत समस्येचे निराकरण करण्यासंबंधी अवगत करण्यात आले आहे. त्यामुळे गोसीखुर्द धरणाच्या लाभक्षेत्रात बांधण्यात आलेल्या वितरण प्रणालीमुळे शेतीचे नुकसान होत असल्याचे म्हणण्यात तथ्य नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

नमूद गावे ही गोसीखुर्द डावा कालव्याच्या लाभक्षेत्रात येत असून, सर्व गावे हे चौरास पट्ट्याचा भाग असून, सदर गावांमध्ये बांधण्यात आलेल्या वितरण प्रणालीची बहुंताश कामे पूर्ण झालेली असून, वितरण प्रणालीवरील Tailing ची बहुतांश कामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर असून, जून २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

त्यामुळे पावसाळयात कालव्यात येणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर लाभक्षेत्र हे चौरास पट्टयात येत असून, लाभक्षेत्रात असलेले बहुतांश नाले हे उथळ आहे. त्यामुळे पावसाळयात पाणी निचरा होण्यास विलंब होतो. सदर नाले /बोडी यांची रुंदीकरण व खोलीकरण करणे अंत्यत गरजेचे आहे. त्यामुळे गावामध्ये साचणारे पावसाचे पाणी निचरा करणे शक्य होईल.

लाभक्षेत्रात बांधण्यात आलेल्या कालव्यामुळे सदर नमूद गावाचे नुकसान होत नसून, पाणी निचरा होण्यास मदत होत आहे. त्यामुळे कालव्यामुळे नुकसान होत असल्याचे म्हणण्यात तथ्य नाही.

(३) डावा कालव्यावरील वितरण प्रणालीचे बहुंताश कामे पूर्ण झाले असून उर्वरित Tailingची कामे जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित अल्पसंख्यांक शाळांतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणेबाबत

**(२१)** * **७०१९ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती अधिनियम,१९७७ मधील कलम ३ नुसार अधिनियम आणि नियमावलीच्या तरतुदी अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळांतील कर्मचाऱ्यांना लागू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १३ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुदानित अल्पसंख्यांक संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेचे संरक्षण नियमावली १९८१ मधील नियम क्र.२६ आणि २७ प्रमाणे दिल्या जात नसल्याचे निदर्शनास आले असून त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सर्वसाधारण शाळेतील अतिरिक्त शिक्षकांना ते अन्य शाळेत समायोजित होईपर्यंत त्यांचे वेतन मूळ शाळेतून सुरु ठेवण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अल्पसंख्यांक संस्थेतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना ते अन्यत्र समायोजित होईपर्यंत त्यांचेही वेतन मूळ शाळेतून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. अल्पसंख्याक संस्थेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महाराष्ट्र खाजगी शाळांतील (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम क्रमांक २६ आणि २७ प्रमाणे कार्यवाही केली जाते.
(३) हे खरे आहे.
(४) अल्पसंख्याक संस्थेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना ते अन्य शाळेत समायोजित होईपर्यंत त्यांचे वेतन मूळ शाळेतून सुरु ठेवण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरुन करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील तेल्हारा लघुसिंचन प्रकल्पाची जमीन मिहान प्रकल्पासाठी हस्तांतरित केल्याबाबत

**(२२) * ६९५९ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील लघु सिंचन प्रकल्पाची ४१.८६ हेक्टर आर जमीन, जलसंपदा विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, महसूल विभागाने परस्पर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (मिहान) यांच्याकडे दिनांक १३ सप्टेंबर, २००६ रोजी हस्तांतरित केली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीच्या हस्तांतरणापोटी शासनाच्या दिनांक १९ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित मापदंडांप्रमाणे ११.७५ कोटी रुपये मिहान प्रशासनाने जलसंपदा विभागास अदा करणे बंधनकारक करण्यात आले होते, तसेच दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या थकीत रकमेबाबत चर्चा होऊनही अद्यापपर्यंत मिहान कंपनीने सदर रक्कम जलसंपदा विभागाकडे जमा केलेली नाही, तसेच तेल्हारा धरणाची देखभाल, दुरुस्ती व सुरक्षिततेची जबाबदारी मिहान प्रकल्पाकडे

असतानाही त्यासंदर्भातील करारनामा तसेच ‘पाणीपट्टी’ (Royalty) भरण्याबाबत मिहान प्रशासनाकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीपोटीची थकीत रक्कम ११.७५ कोटी रुपये व्याजासह वसूल करण्यासाठी, तसेच जमिनीच्या हस्तांतरणाची तांत्रिक व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदरची हस्तांतरित जमीन ही ४१.८६ हेक्टर आर नसून ४०.६२ हेक्टर आर आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२३)** * **७६०१ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून, सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यामध्ये सध्या एकही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्यामुळे आर्वी परिसरासह संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील गरीब व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी इतर जिल्ह्यांमध्ये जावे लागत असून त्यांची शैक्षणिक व आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्वी येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी आवश्यक जागा उपलब्ध असून प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला असताना, सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

वर्धा जिल्ह्यामध्ये आर्वी येथे शासकीय तंत्रनिकेतन असून या संस्थेत ७० टक्के विद्यार्थी हे वर्धा जिल्ह्यातील आहेत. तसेच, आर्वी शहरापासून ५० कि.मी. अंतरावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती आणि ८० कि.मी. अंतरावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ या दोन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे प्रथम वर्षासाठी ३९० प्रवेश क्षमता मंजूर असून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यवतमाळ येथे ३०० प्रवेश क्षमता मंजूर आहे.

(३) सदर मागणीच्या अनुषंगाने, आर्वी, जि.वर्धा येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांनी स्थापन केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी दिनांक ०९/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

सदर अहवालानुसार, आर्वी पासून ५० कि.मी. अंतरावर अमरावती, ८० कि.मी. अंतरावर यवतमाळ आणि १०० कि.मी. अंतरावर नागपूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत, तसेच, सद्य:स्थितीत वर्धा जिल्ह्यात असलेल्या एकूण ६ अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील तीन वर्षात एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० ते ३५ टक्के जागा रिक्त राहत आहेत. यासारख्या वस्तुस्थितीदर्शक बाबी विचारात घेऊन, मौजे आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा येथे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दानापूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ७०९२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दानापूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जिल्हा परिषदेची शाळा अत्यंत जीर्ण अवस्थेत असून इमारत मोडकळीस आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या दुरवस्थेबाबत शालेय व्यवस्थापन समिती व पालकांनी वारंवार जिल्हा परिषद तसेच संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे वर्गखोल्यांच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी करूनही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दानापूर येथील जिल्हा परिषद शाळेत सध्या १०६ विद्यार्थी शिक्षण घेत असून शिक्षकांची अपुरी संख्या तसेच वर्गखोल्यांची अत्यंत दयनीय अवस्था यामुळे स्थानिक नागरिक व पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दानापूर येथील जिल्हा परिषद शाळेची तात्काळ देखभाल व दुरुस्ती करून सुरक्षित वर्गखोल्या उपलब्ध करून देणे तसेच आवश्यकतेनुसार पुरेसे वर्गशिक्षक नियुक्त करून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शाळेतील धोकादायक वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नसून मराठी व उर्दू माध्यम एकाच प्रांगणात असून तेथील सुस्थितीत असलेल्या वर्गखोलीत विद्यार्थी बसविण्यात येते आहे. शाळेची

धोकादायक इमारत पाडणेबाबत तसेच नवीन वर्गखोल्या मिळणेबाबतचा प्रस्ताव उपअभियंता (बांधकाम) जि.प.उपविभाग पं.सं.भोकर यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

दानापूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये ९२ मुले शिक्षण घेत आहे. गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून दोन शिक्षकांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२६ मधील प्राथमिक शाळा दानापूर येथील २ वर्ग खोल्या दुरूस्तीकरीता रक्कम रुपये ५.०० लक्ष देण्यात आले आहे.

(४) वर्गखोल्यांबाबतची देखभाल व दुरूस्ती करण्याकरीता अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता सदर शाळेवर अध्यापनासाठी दोन शिक्षकांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुरगाव (जि.नांदेड) येथे चैतन्य टेक्नो स्कूल नावाची बोगस शाळा सुरु असल्याबाबत

**(२५)** * **६७९२ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरालगत असलेल्या खुरगाव (मालेगाव रोड) येथे शासनाची कोणतीही अधिकृत परवानगी अथवा मान्यता न घेता 'चैतन्य टेक्नो स्कूल' या नावाने बोगस शाळा सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता 'चैतन्य टेक्नो स्कूल' या नावाने बोगस शाळा सुरू करणाऱ्या संबंधित संस्था, शाळा व्यवस्थापन तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदर बोगस शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व त्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित राहावे, यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) किड्स किंग्डम पब्लिक स्कूल या मान्यताप्राप्त शाळेने चुकीच्या पध्दतीने "चैतन्य टेक्नो स्कूल" या अनधिकृत शाळेचे नाव वापरून विद्यार्थी व पालकांची दिशाभूल केल्यामुळे "किड्स किंग्डम पब्लिक स्कूल" या शाळेची मान्यता काढणेबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.नांदेड यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांचेकडे सादर केला आहे.

त्यानुषंगाने, विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी दिनांक १३/०२/२०२६ रोजी सुनावणी आयोजित करून उक्त नमूद शाळेने चुकीच्या पध्दतीने चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेचे नाव वापरून विद्यार्थी व पालकांची दिशाभूल केल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. त्यानुसार, सदर शाळेची मान्यता काढून घेणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, "चैतन्य टेक्नो स्कूल" या शाळेने शासनाची मान्यता नसताना शाळेच्या नावाचा फलक लावून विद्यार्थी व पालकांकडून अनधिकृतपणे प्रवेशशुल्क वसूल केल्यामुळे सदर शाळेच्या व्यवस्थापनावर

कायदेशीर कारवाई करणेबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.लातूर यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्हा परिषद शाळांमधील वीज देयकांच्या थकबाकीचा भरणा करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६)** * **६६९५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत सुमारे ३१४४ शाळांमध्ये स्वतंत्र वीज कनेक्शन असून, शाळांच्या वीज देयकांचे सुमारे २.५ कोटी रुपये थकीत असल्यामुळे शाळांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याने संबंधित शाळांमधील डिजिटल शिक्षणात व्यत्यय निर्माण झाला असून, संगणक, प्रोजेक्टर व इतर शैक्षणिक साधनांचा वापर बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकसभा निवडणूक सन २०२४ दरम्यान मतदान केंद्र म्हणून जिल्हा परिषद शाळांचा वापर करण्यात आला असताना त्या काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी व वीज देयक भरण्यासाठी स्वतंत्र तरतूद न केल्यामुळे थकबाकी वाढली असून मागील १० महिन्यांपासून वीज देयक भरण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात जिल्हा परिषद शाळांमधील वीज देयके थकीत राहू नये व विद्यार्थ्यांचे डिजिटल शिक्षण अखंडित राहावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या एकूण ३५३१ शाळा असून त्यापैकी ३२१५ शाळांमध्ये (३१५५ शाळांमध्ये विद्युतद्वारे व ६० शाळांमध्ये सोलार सिस्टिमद्वारे) विद्युत पुरवठा सुरु आहे. सन २०२५-२६ करीता अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या वीजबिलापोटी रुपये ४.६३ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करण्यात आली आहे. तसेच २५४ खंडीत वीजपुरवठा असलेल्या शाळांना वीजपुरवठा नव्याने सुरु करणे व वीजजोडणी देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे नियमित व थकीत विद्युत देयके भरण्यासाठी रुपये १८.४३ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांची विद्युत देयके वेळेवर अदा करण्यासाठी संयुक्त बिलिंग (Composite Billing) पध्दतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील पालखेड डावा कालवा आठमाही करण्याबाबत

**(२७) * ६६०७ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील विविध वळण योजनांमुळे पालखेड समूहातील पाणीसाठ्यात वाढ झाल्याने, पालखेड डावा कालवा (तालुका येवला) येथील वितरीका क्रमांक ४६ ते ५२ हा खरीप कालव्याऐवजी आठमाही कालवा करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री तथा मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नाशिक यांना निवेदन सादर केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीमुळे सिंचन क्षेत्रात वाढ होऊन कृषी उत्पादनात व राष्ट्रीय उत्पादनात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता पालखेड डावा कालवा येथील वितरीका क्रमांक ४६ ते ५२ हा आठमाही कालवा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक जिल्ह्यातील पालखेड डावा कालवा (ता.येवला) कि.मी.११० ते १३० वितरिका क्रमांक ४६ ते ५२ खरीप कालवा आठमाही करण्याबाबत मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण महोदय यांनी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नाशिक यांना दिनांक १८/०६/२०२५ व दिनांक २९/०६/२०२५ रोजी निवेदन दिले आहे.

नाशिक जिल्ह्यातील विविध वळण योजनांमुळे पालखेड समुहातील पालखेड धरण, करंजवण धरण, वाघाड धरण, ओझरखेड धरण, तिसगांव धरण व पुणेगांव धरण या धरणांमधून उपलब्ध होणारे पाणी धरणांमधून खरीप हंगामात वाहून जाणार असल्याने समुहातील धरणाच्या पाणीसाठ्यात कुठलीही वाढ होणार नाही.

(२) पालखेड डाव्या कालव्यासाठी प्रकल्पीय तरतुदीनुसार रब्बी हंगामासाठी उपलब्ध पाणी १६०.०२ दलघमी असून त्यातून १) बिगर सिंचनातील वाढीमुळे ४०.९८३ दलघमी २) आकस्मिक आरक्षणामुळे (मागील पाच वर्षाच्या सरासरीनुसार) २६.५२८ दलघमी ३) गाळामुळे झालेली घट १८.८०८ दलघमी अशी एकूण ८६.३१९ दलघमी घट वजा जाता फक्त ७३.७०१ दलघमी पाणी उपलब्ध होते. त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेअभावी पालखेड डावा कालवा आठमाही करणे शक्य नसल्याने कोणतीही कार्यवाही प्रस्तावित केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५३९ शाळा आरटीईच्या कक्षेबाहेर असल्याबाबत

**(२८) * ८४५७ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये आरटीई (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम) अंतर्गत पात्र असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १,१३८ शाळांपैकी ५३९ शाळा आरटीईच्या कक्षेबाहेर असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा आरटीईच्या कक्षेबाहेर गेल्यामुळे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेशापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळा आरटीईच्या कक्षेबाहेर जाण्यामागची कारणे काय आहेत तसेच आरटीई अंतर्गत सदर शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून प्रत्येकी सुमारे रुपये १८,००० इतकी फी शाळांना अदा करण्यात येत असून सदर रक्कम अत्यंत अपुरी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या शिक्षण मोफत उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या अधिसूनेद्वारे नियम तयार केले आहेत.

आरटीई २५ टक्के अंतर्गत सर्व खाजगी विनाअनुदानित शाळांना एनआयसी या संस्थेद्वारे तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. तद्नंतर आरटीई प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या प्रणालीद्वारे लॉटरीद्वारे बालकांची निवड करण्यासाठी पालकांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देण्यात येऊन पात्र बालकांच्या पालकांनी केलेल्या नोंदींनुसार प्रवेशासाठी नजिकच्या शाळेत प्रवेश देण्यात येतो.

आरटीई अंतर्गत खर्चाच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर कोविड-१९ नंतर सन २०२३-२४ पासून रुपये १७,६७०/- इतका निश्चित केलेला आहे. या दरानुसारच शाळांना आरटीई २५ टक्के प्रतिपूर्तीची रक्कम देण्यात येते. आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश देताना शाळांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून वंचित व दुर्बल घटकातील मुलांना २५ टक्के जागांवरील शिक्षण देणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत आसोलामेंढा मुख्य कालव्यावरील लघुकालव्यांच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२९) * ६८०८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत आसोलामेंढा मुख्य कालव्यावरील येरगाव, खेडी, भेजगाव वितरिका तसेच बाबराळा, गडीसुर्ला, बेंबाळ चक व सावली क्र. ९, १० व ११ (अ) या लघुकालव्यांचे बांधकाम बंद

नलिका वितरण प्रणालीद्वारे करण्यात आले असून, त्यामार्फत ४४०६ हेक्टर लागवडीयोग्य क्षेत्रास योग्य सिंचन सुविधा उपलब्ध करून ५७७६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गठीत केलेल्या पथकाने केलेल्या चौकशीत भेजगाव वितरिकेच्या कामांमध्ये प्रत्यक्ष काम न करता संबंधित कंत्राटदारास सुमारे रुपये २२१ लक्ष इतके अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले असूनही तत्कालीन अभियंत्यावर अद्यापपर्यंत कोणतीही प्रशासकीय अथवा शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर आर्थिक अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधित कार्यकारी अभियंता यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी सदर अनियमिततेच्या अनुषंगाने दिनांक ०३/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधीताविरूध्दचे प्रारुप दोषारोपपत्रे शासनास सादर केली.

(२) व (३) सदर प्रकरणी क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त प्रस्तावानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त अभिप्रायानुसार सुरु आहे. सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास, महामंडळ, नागपूर यांचेकडुन दिनांक २०/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत

**(३०) * ७७३३ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.अरुण लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टीने बाधित झालेल्या भागातील शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाचे पुनर्गठन करून शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस किमान एक वर्षाभरासाठी स्थगिती देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामासाठी सोलापूर जिल्ह्यात पीक कर्ज वाटपाचे एकूण उद्दिष्ट २३४० कोटी रुपये निश्चित करण्यात आले असतानाही, प्रत्यक्षात फक्त २१९ कोटी ५५ लाख इतकेच पीक कर्ज वितरित झाले असून ही टक्केवारी सुमारे ९ टक्के इतकीच आहे, तसेच सांगली जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये पीक कर्ज वाटपाची सुरुवात झाली असली तरीही प्रत्यक्षात कर्ज वाटप अत्यंत

संथ गतीने सुरू असल्याने अद्यापपर्यंत केवळ ५ टक्केच पीक कर्ज जिल्ह्यातील बँकांनी दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यात या सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठीची अंमलबजावणी नेमकी कशी झाली आहे याची माहिती शेतकऱ्यांना नसल्याने सर्वत्र संभ्रम अवस्था निर्माण झाली असून रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटपाच्या उद्दिष्टानुसार जिल्ह्यातील एकूण १ लाख ९० हजार ५७८ शेतकऱ्यांपैकी केवळ सुमारे १० हजार ५२१ शेतकऱ्यांनाच पीक कर्ज मिळाले असून जिल्हा बँक,राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका, खाजगी तसेच ग्रामीण बँकांना देण्यात आलेले पीक कर्ज उद्दिष्ट अद्याप पर्यंत अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांना अनेक आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असल्याने शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून किंवा बिगर संस्थात्मक स्त्रोतांकडून कर्ज घ्यावे लागत असल्याची माहिती त्याच दरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पीक कर्ज वाटपाच्या उद्दिष्टाच्या तुलनेत अत्यल्प कर्जवाटप झाल्यामुळे सांगली, सोलापूर जिल्ह्यांसह राज्यातील बँकांना शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वितरित करण्यासाठी देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तसेच पीक कर्ज वितरणाची टक्केवारी वाढविण्याबाबत व अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतकरी कर्जाचे पुनर्गठन करून शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीचा आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) नाही.
(३) अंशत: खरे आहे,

शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ व शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०२५ मधील सुचनेनुसार सहकार आयुक्त यांनी दिनांक २७/११/२०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करुन कर्ज वसुलीस स्थगिती व सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक १५/०१/२०२६ पर्यंत सांगली जिल्ह्यात रब्बी हंगामामध्ये एकूण २१६६२ शेतकऱ्यांना रुपये १७७.०६ कोटी पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यात परवानाधारक सावकारांची संख्या ६४९ इतकी आहे. या सावकारांनी सन २०२५-२६ मध्ये सुमारे ३७,४३० व्यक्तींना रक्कम रु ६४.७६ कोटी इतके कर्ज वाटप केले आहे. जिल्ह्यातील परवानाधारक सावकारांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप केलेले नाही.
(४) सन २०२५-२६ च्या पीक कर्ज वाटप लक्षांक पुर्ततेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांनी खरीप

हंगाम आढावा सभेमध्ये क्षेत्रिय अधिकाऱ्यांना व राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये बँकांना सुचना दिल्या आहेत. या सुचनांप्रमाणे बँक स्तरावरील पीक कर्ज वाटपाचा आढावा राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत त्याचप्रमाणे सहकार आयुक्तालयामार्फत नियमित घेण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ व शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०२५ मधील सूचनांनुसार सहकार आयुक्त यांनी दिनांक २७/११/२०२५ रोजी परित्रक निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकान्वये त्यांनी पीक वसुलीस स्थगिती (एक वर्षासाठी) व सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत

बँकांना सुचना दिलेल्या आहेत व या सुचनेप्रमाणे शेतकऱ्यांची संमती घेऊन पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची कार्यवाही बँकस्तरावर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नाशिक यांनी भटक्या कुत्र्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये उपाययोजना करण्यासाठी मुख्याध्यापकांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केल्याबाबत

**(३१) * ७३६५ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक संस्थांच्या परिसरात आढळणाऱ्या भटक्या कुत्र्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये उपाययोजना करणेकरीता नोडल अधिकारी म्हणून मुख्याध्यापक, तर सर्वेक्षणासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिपत्रक मागे घेण्यासाठी शिक्षक संघटना राज्यभर आंदोलन करणार असून, यात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचा उल्लेख केला आहे, तसेच या निर्णयाबद्दल शिक्षक संघटना आणि पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीच शिक्षक व इतर शैक्षणिक अधिकारी यांना निवडणूक व इतर विभागाची कामे सोपवलेली असल्यामुळे विद्यर्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असतानाही सदरचे अतिरिक्त काम देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील शिक्षणाचा दर्जा खालवू नये याकरीता सदरचा काढलेला आदेश रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ०२/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव व श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यमांच्या शाळांचे मुख्याध्यापक यांना नोडल अधिकारी नेमण्याच्या सूचना दिल्या आहे.
(२), (३) व (४) SUO MOTO WRIT PETITION ५/२०२५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७/११/२०२५ रोजी भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबाबत शालेय शिक्षण विभागाने प्रत्येक शाळेच्या परिसराची देखभाल, स्वच्छता तसेच भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही. तसेच उघड्यावरील फेकलेले खाद्यपदार्थाचे योग्य विल्हेवाट लावणे याची खात्री करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून सदर अधिकाऱ्याची माहिती प्रवेशद्वारावर ठळकपणे प्रदर्शित करावी व अधिकारक्षेत्रातील जिल्हा परिषद, नगरपालिका संस्था/प्राधिकरणाला कळवावे अशा सूचना दिल्या आहेत.

तथापि, शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२४ अन्वये शैक्षणिक कामे, अशैक्षणिक कामे व आरटीई ॲक्टनुसार करावयाची अनिवार्य कामे याबाबतचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसद यासाठी होणाऱ्या निवडणूकांची कामे ही अनिवार्य कामे आहेत. तसेच दिनांक २३/०८/२०२४ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद करण्यात आलेली अशैक्षणिक कामे शिक्षकांना सोपविण्यात येऊ नयेत, याबाबत इतर विभागांनी त्याच्या क्षेत्रिय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत.

तसेच शिक्षकांना देण्यात येणारी शैक्षणिक व अशैक्षणिक कामे विचारात घेऊन शिक्षकांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा तसेच शिक्षकांची कामे सुलभ व्हावीत यासाठी सरल व युडायस प्रणालींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. तसेच, शाळा स्तरावरील विविध समित्यांचे विलीनीकरण करुन समित्यांची संख्या देखील कमी करण्यात आलेली आहे. त्यामुळे शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची शासन दक्षता घेत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधिक्षक कार्यालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * ६८८७ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांतील शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधिक्षक कार्यालयांमध्ये मंजूर पदे व प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी यामध्ये तफावत असून अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ वेतन पथक अधिक्षक कार्यालयात एकूण ९ पदे मंजूर असताना त्यापैकी वेतन पथक अधिक्षक १, वरिष्ठ लिपिक १, मुख्य लिपिक १, कनिष्ठ लिपिक १ व शिपाई १ असे केवळ ५ कर्मचारी कार्यरत असून ४ पदे रिक्त आहेत, तसेच हीच परिस्थिती अमरावती विभागातील इतर जिल्ह्यांमध्येही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे वेतन पथक अधिक्षक कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन, सेवाविषयक कामकाजात विलंब होऊन त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती विभागातील अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांतील शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधिक्षक कार्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) विभागाच्या दिनांक ०२/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षणाधिकारी संवर्गातील आणि दिनांक २४/०९/२०२५ व दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच, उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेले एकूण १०९ परिविक्षाधीन अधिकारी सीपीटीपी १० व ११ अंतर्गत प्रशिक्षण घेत आहेत. सदर परिविक्षाधीन अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना नियमित पदभार/पदस्थापना देण्यात येणार आहे. शिक्षण उपसंचालक यांचे अधिनस्त शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व वेतन पथक (प्राथमिक/माध्यमिक) कार्यालयातील गट-क ची मंजूर पदे ४९ असून ३४ पदे भरलेली आहेत व १५ पदे रिक्त आहेत. संबंधित कार्यालयातील गट-ड संवर्गातील पुरेशी पदे भरलेली आहेत. विभागाच्या अधिनस्त सर्व संवर्गातील सरळसेवेची व पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुळशी (जि.पुणे) तालुक्यासाठी टाटा धरणातून पिण्यासाठी व सिंचनासाठी वाढीव पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३३) * ७६४२ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीच्या सिंचनासाठी टाटा धरणातून दोन टीएमसी (TMC) वाढीव पाणी मिळावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी केलेल्या उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

प्राप्त निवेदनानुसार २ TMC मधील १.२० TMC पाणी मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा टप्पा १ व २ मधील ४४ गावांसाठी मागणी असून ०.८० TMC पाणी कोळवण खोऱ्यातील ३००० हे. क्षेत्रासाठी मागणी करण्यात आली आहे.

(२) मुळशी धरण हे टाटाच्या मालकीचे असून पाणी उपलब्धता व नियोजन टाटा मार्फत होत असल्याने प्रादेशिक पाणीपुरवठा व सिंचनासाठी अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देणे जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत येत नाही.

परंतु सन २००३ मध्ये टाटा कंपनी सोबत केलेल्या करारनाम्याद्वारे मुळशी बोगदा मध्यम प्रकल्पातून मुळा नदीत १.६४६ टिएमसी पाणी उपलब्ध करुन दिले जाते. त्याद्वारे सुमारे ५००० हे. क्षेत्र सिंचन करणेबाबत करारनाम्यात तरतूद आहे. त्यानुसार सिंचन व बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत यामध्येही पाणी शिल्लक नसल्याने अधिकच्या मागणीनुसार पाणी उपलब्ध करून देणे ही शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराची माहिती 'सरल' प्रणालीवर नोंदविणेबाबत

**(३४)** * **८४८० श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार वितरीत केल्याबाबत शाळांनी दररोज दुपारी २ वाजेपर्यंत लाभार्थी संख्या व उपस्थितीची माहिती 'सरल' प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे शालेय शिक्षण विभागाकडून अनिवार्य करण्यात आलेले असतानाही, अनेक शाळांकडून सदर माहिती नियमितपणे भरली जात नसल्यामुळे राज्यातील विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याचे केंद्र शासनाच्या अहवालातून दिसून आल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय पोषण आहाराबाबत दैनंदिन माहिती वेळेत न भरणे हे शासकीय नियमांचे उल्लंघन असून, त्यामुळे या योजनेची उद्दिष्टे साध्य होत नसल्याने केंद्र शासनाकडून संबंधित शाळा प्रमुख व क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कार्यवाहीचे संकेत देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंटरनेट कनेक्टिव्हिटीतील अडथळे, मनुष्यबळाची कमतरता, अध्यापन कार्यावर होणारा परिणाम तसेच काही ठिकाणी शाळा स्तरावर माहिती भरण्यातील हलगर्जीपणा यांमुळे सदर योजनेच्या प्रभावी देखरेखीत (Monitoring) अडथळे निर्माण होत असून, परिणामी प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले चौकशीच्या अनुषंगाने शालेय पोषण आहाराबाबत' सरल' प्रणालीवर ऑनलाईनद्वारे माहिती न भरणाऱ्या शाळांवर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर माहिती भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व स्वयंचलित (Automated) करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२५ च्या पत्रान्वये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सर्व शाळांनी दररोज दु/०२/०० वाजेपर्यंत दैनंदिन लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंद

पोर्टलवर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येत असून कोणताही विद्यार्थी पोषण आहाराच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) उपस्थिती न भरलेबाबत शाळाप्रमुख व क्षेत्रिय अधिकाऱ्यावर अद्यापर्यंत कोणतीही प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली नाही. तथापि, नियमितपणे आढावा घेऊन विहित वेळेत लाभार्थींची नोंद पोर्टलवर करणेबाबत सूचना दिल्या जातात.

काही दुर्गम भागातील शाळांकडून इंटरनेट कनेक्टिव्हीटीच्या अभावी संबंधित विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला असतानाही माहिती भरण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे पोर्टलवर विद्यार्थी संख्या कमी असल्याचे निदर्शनास येते. प्रत्यक्षात संबंधित विद्यार्थ्यांनी पोषण आहाराचा लाभ घेतलेला असल्याने ते पोषण आहारापासून वंचित राहत नाहीत. यावर उपाययोजना म्हणून दरवर्षी अशा संबंधित शाळांना मागील माहिती भरण्याकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित शाळांना अनुदान तसेच अंशतः अनुदानित शाळांना टप्पा सूत्रानुसार वाढीव अनुदान देण्याबाबत

**(३५) * ८२२६ डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देणे तसेच सध्या २० टक्के, ४० टक्के किंवा ६० टक्के अनुदान मिळत असलेल्या अंशतः अनुदानित शाळांना टप्पा सूत्रानुसार पुढील वाढीव अनुदान टप्पा लागू करणे ही मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित असून शिक्षक संघटनांनी आगामी शैक्षणिक वर्ष (जून, २०२६) पासून सदर टप्पे लागू करण्याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शिक्षकांनी गेली १५ ते २० वर्षे विनाअनुदानित तत्त्वावर विनामोबदला सेवा बजावून शासनाच्या कोट्यवधी रुपयांची बचत केली असतानाही, सध्याच्या महागाईच्या काळात त्यांना नियमित वेतन व सेवा-सुरक्षा न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या अनुभवी शिक्षकांना ‘टीईटी’ (Teacher Eligibility Test) परीक्षा अनिवार्य केल्यामुळे त्यांच्या सेवा-स्थैर्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विनाअनुदानित शिक्षकांना न्याय देण्यासाठी तसेच दीर्घकाळ सेवेत असलेल्या अनुभवी शिक्षकांना ‘टीईटी’ परीक्षेतून सूट देण्याबाबत व अंशतः अनुदानित शाळांना वाढीव अनुदानाचे टप्पे वेळेत लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ नुसार, सध्या २० टक्के/४० टक्के/ ६० टक्के टप्पा अनुदान घेत असलेल्या शाळांना दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ पासून वाढीव २० टक्के टप्पा अनुदान निधीसह मंजूर करण्यात आले आहे. तसेच, दिनांक ११/११/२०२२ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी विहीत मुल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या तथापि, शासनस्तरावर अघोषित असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना नव्याने २० टक्के अनुदानासाठी पात्र करुन अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.१३८५/२०२५ मध्ये दिनांक ०१/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार वर्ग इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व कार्यरत शिक्षकांची सेवा ५ वर्षापर्यंत राहिली असेल तर टीईटी अनिवार्य नाही. तथापि, त्यांना पदोन्नती हवी असेल तर टीईटी आवश्यक आहे. तसेच ५ वर्षापेक्षा जास्त सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना २ वर्षांमध्ये टीईटी उत्तीर्ण करण्यास मुभा दिलेली आहे.

यासाठी या शिक्षकांना केंद्र शासनाची सीटीईटी व राज्य शासनाची टीईटी देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास विधी व न्याय विभागाने असहमती दर्शविली असली तरी यासंदर्भात अजून काही तार्कीक मुद्दे मांडून पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास सहमती दर्शविण्याबाबत पुनःश्च विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे या शिक्षकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी पतसंस्थांमधील लहान ठेवीदारांना विमा संरक्षण देण्याबाबत

**(३६)** * **६८३७ श्री.श्रीकांत भारतीय:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी पतसंस्थांची संख्या २०,००० पेक्षा अधिक असून त्यांच्याकडे सुमारे रुपये ९३,००० कोटी ठेवी असून या पतसंस्थांच्या ठेवींमध्ये घोटाळे किंवा अनियमिततेची प्रकरणे वाढत असल्यामुळे लहान ठेवीदारांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लहान ठेवीदारांना वेळेत त्यांच्या ठेवी व व्याज परत मिळावी यासाठी बँक नियामक मंडळ व सहकार विभाग व शासन यांनी कोणती कालमर्यादा निर्धारित केली आहे तसेच ठेवीदाराचे हित राखण्यासाठी आणि बँकांमधील वित्तीय पारदर्शकता वाढविण्यासाठी सहकार विभागाने एक समर्पित "ठेवीदार संरक्षण यंत्रणा" तयार करण्याचा विचार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लहान ठेवीदारांसाठी ठेवी व परतावा सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य बँक नियमन व सहाय्यसह कोणत्या तांत्रिक किंवा कायदेशीर सुधारणा प्रस्तावित केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) राज्यात सहकारी पतसंस्थांची संख्या १९९४८ असून त्यांच्याकडे सुमारे रुपये ९०५०० कोटी ठेवी आहेत.

राज्यातील सहकारी पतसंस्था तसेच बहुराज्यीय सहकारी पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी संरक्षित करण्याच्या दृष्टीने सदर संस्थांनाही DICGC कडून विमा संरक्षण मिळावे याकरीता केंद्रिय सहकारीता मंत्रालय यांना शासनामार्फत दिनांक २४/०३/२०२५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(२) पतसंस्थांमधील ठेवींना विमा संरक्षण देण्यासाठी प्रमुख विमा कंपन्यांकडून Expression of Interest मागविणेसंदर्भात कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापि, राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती / पगारदार सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांचे संरक्षण, पतसंस्थांमधील ठेवी संरक्षित करणे व आर्थिक शिस्त आणण्यासाठी, सन २०१७ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये बिगर कृषी सहकारी पतसंस्थांसाठी प्रकरण क्र.११-१अ समाविष्ट करण्यात आले आहे. सदरचे प्रकरण शासन राजपत्राद्वारे दिनांक २२/०२/२०१९ पासून अंमलात आले आहे.

पतसंस्थांमधील ठेवी संरक्षित करण्यासाठी ‘स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी’ योजना तयार करण्यात आली असून, शासनाने दिनांक ०१/०१/२०२४ रोजी सदर योजनेस मान्यता दिली आहे. योजनेत सहभागी पतसंस्थांना दिनांक ०१/०४/२०२६ पासून सदर योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी योजना लागू केली असल्याने सद्य:स्थितीत तांत्रिक किंवा कायदेशीर सुधारणा प्रस्तावित केल्या नाहीत अथवा करण्याचे प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ येथील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालय विद्यार्थीनींकडून अधिक शुल्काची आकारणी करित असल्याबाबत

**(३७) * ७८६८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ येथील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयामध्ये गेल्या दहा ते बारा वर्षांच्या कालावधीत विद्यार्थिनींकडून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रस्तावित व मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात आल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, विद्यापीठाची पूर्वमंजुरी नसताना संबंधित महाविद्यालयाने पॉवर चार्जेस, इतर उपक्रम शुल्क, कॉम्प्युटर लॅब फी इत्यादी बाबींअंतर्गत अतिरिक्त शुल्क आकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास विद्यार्थिनींकडून जास्त आकारलेली शुल्क रक्कम तसेच त्यावरील दंडाची रक्कम त्वरित विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण निधीत जमा करण्याचे आदेश दिले असून सदर प्रकरणी विद्यापीठ स्तरावर अथवा शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जादा आकारलेली शुल्क रक्कम व दंडाची रक्कम लवकरात लवकर विद्यार्थी कल्याण निधीत जमा करण्याबाबत संबंधित महाविद्यालयाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाने समिती गठित केली होती. समितीने जमा झालेल्या रकमेच्या १०% टक्के दंड सदर महाविद्यालयास आकारण्यात यावा तसेच सदर दंडाची रक्कम "विद्यार्थी विकास निधीच्या" खात्यात जमा करावी अशी शिफारस केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्थेने कामाचे वाटपात अनियमितता केल्याबाबत

**(३८) * ८०७१ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्था संघ मर्यादित यांनी मजुर सहकारी संस्थांना कामाचे वाटप करताना शासन निर्णयांचे उल्लंघन करून, भ्रष्ट मार्गाने मर्जीतील मजुर सहकारी संस्थांना आर्थिक पात्रता प्रमाणपत्रे देऊन कामे वाटप केल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने इतर मजुर सहकारी संस्थांमध्ये तीव्र संताप व नाराजी निर्माण झाली असून सदर प्रकरणी संघाच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द एफ.आय.आर. दाखल करून सदर वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्था बरखास्त करून प्रशासक नेमण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २३/१०/२०२५ रोजी शासनास निवेदन दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदन प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी मा.सहकार मंत्री व सहकार विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला असतानाही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर निवेदनातील मागणीनुसार वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ मर्या. यांनी काम वाटप करताना केलेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्था बरखास्त करुन प्रशासक नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.

वर्धा जिल्हा मजुर सहकारी संस्था संघ, मजुर सहकारी संस्थांना कामाचे वाटप करतांना शासन निर्णयांचे उल्लंघन करुन, मजुर सहकारी संस्थांना आर्थिक पात्रता प्रमाणपत्रे देत असल्याबाबत मा.श्री.दादाराव केचे, विधानपरिषद सदस्य यांचे दिनांक २३/१०/२०२५ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) प्रश्नाधीन निवेदनातील मुद्दयांच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरीता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांचे कार्यालयामार्फत दिनांक २०/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक (प्रशासन) यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व त्यामध्ये अनियमितता आढळल्यास सहकार कायद्यातील तरतुदीनुसार जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जायकवाडी धरणाच्या पाण्यामुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(३९) * ७०६९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गळनिंब, अमळनेर, लखमापूर व भिवधानोरा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जायकवाडी धरणाच्या पाण्यामुळे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मा.जलसंपदा मंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जायकवाडी धरणाच्या पाण्यामुळे गावांतील शेतकऱ्यांच्या पिकांचे वारंवार नुकसान होत असल्याने विशेष अतिरिक्त भूसंपादनाची कार्यवाही दीर्घ काळापासून प्रलंबित असल्याने अमळनेर येथील शेतकऱ्यांनी गोदावरी नदी पात्रात जलसमाधी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शेतकऱ्यांनी नुकसानभरपाई तसेच अतिरिक्त भूसंपादनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे अमळनेर, लखमापूर व गळनिंब येथील शेतकऱ्यांनी दिनांक २३/१२/२०२५ रोजी जलसमाधी आंदोलन केले होते.

(३) दिनांक ०१/०७/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये नुकसानग्रस्त जमिनीचे अतिरिक्त भूसंपादनाबाबत महामंडळाना निर्देश देण्यात आलेले आहेत.

संबंधित प्रकल्पग्रस्त यांच्या मागणीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या क्षेत्राचे संयुक्तरित्या महसूल, कृषी व जलसंपदा विभाग यांच्या मार्फत पंचनामे करणे करीता महसूल विभागामार्फत आदेश निर्गमित करण्यात आले. त्या अनुषंगाने संयुक्त पंचनामे करण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक २८/०८/२०२५ रोजी सदर बाधित गटांची भूसंपादन संयुक्त मोजणी करण्यात आली असून पुढील कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य केल्याबाबत

**(४०) * ८००३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य केल्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर, त्या निर्णयाच्या अनुषंगाने पुनर्विचार याचिका दाखल करण्याची मागणी राज्यातील विविध शिक्षक संघटना व शिक्षकांनी वारंवार शासनाकडे केली असतानाही त्याबाबत कार्यवाही

न झाल्याच्या निषेधार्थ शिक्षकांच्यावतीने नांदेड शहरात दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी मुक मोर्चा काढण्यात आला असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुक मोर्चात सहभागी झालेल्या आंदोलक शिक्षकांनी मा.सर्वोच्च न्यायालयात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) निकालासंदर्भातील निर्णयाविरोधात पुनर्विचार याचिका तात्काळ दाखल करावी, टीईटी निकालाचा चुकीचा अर्थ काढून सुरु असलेली कारवाई थांबवावी, शिक्षण सेवक योजना रद्द करुन नियमित वेतनश्रेणी लागू करावी, शिक्षकांना १०, २०, ३० वर्षानंतरची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, दिनांक १५ मार्च, २०२५ ची संचमान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बंद असलेली पदभरती सुरु करावी, विविध अशैक्षणिक व ऑनलाईन उपक्रमांमधून शिक्षकांची मुक्तता करावी, विषय पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मंजूर करावी, वस्तीशाळेतील शिक्षकांची सेवा नियुक्ती तारखेपासून ग्राह्य धरण्यात यावी तसेच कमी पटसंख्येच्या शाळा बंद न करता सुरु ठेवाव्यात इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शिक्षक संघटना व शिक्षकांनी निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अशा विविध प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

(३) टीईटी प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुध्द शालेय शिक्षण विभाग स्वत:च्या जबाबदारीवर पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास तयार असल्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर याचिका दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. शिक्षण सेवक कालावधी हा उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी आहे व सदर कालावधी एकूण अर्हताकारी सेवेच्या परिगणनेसाठी विचारात घेतला जातो. सद्य:स्थितीत केंद्र शासनाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतन संरचना लागू करण्यात आली आहे. अद्यापि केंद्र शासनाने १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू केली नसल्याने राज्य शासनाने देखील त्यात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत. संच मान्यतेबाबतचा दिनांक १५/०३/२०२४ रोजीचा शासन निर्णय मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी वैध ठरविला आहे. शिक्षकेतर पदांसाठीची अर्हता सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असून त्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल. दिनांक २३/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षकांना अशैक्षणिक कामे सोपविण्यात येऊ नयेत असे निदेश अन्य विभागांना देण्यात आले आहेत. ऑनलाईन कामकाजाच्या सुलभतेच्या दृष्टीने सरल व युडायस या प्रणालीचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. वस्तीशाळा निमशिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबतच्या दिनांक ०१/०३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयात असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे की, यापूर्वीच्या सेवेचे कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत तसेच त्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबतचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कांदा खरेदीची देयके नाफेडकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४१)** * **८०८० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्यात आली असून, खरेदी केलेल्या कांद्याची रक्कम वेळेत अदा न झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी नाफेड कार्यालयात आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, नाफेडमार्फत खरेदी करण्यात आलेल्या कांद्याचे पैसे वेळेत न मिळाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, कर्जफेड, पुढील शेती हंगामाची तयारी तसेच दैनंदिन खर्च भागविणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाफेडमार्फत कांदा खरेदी केलेल्या एकूण किती शेतकऱ्यांची किती रकमेची देयके प्रलंबित आहेत, तसेच सदर देयके अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यपध्दती निश्चित केली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना देयके अदा करण्यास झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरता निधी योजनेतंर्गत नाफेड व एनसीसीएफ या संस्थांच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी केला जातो. त्यानुसार सन २०२५-२६ मध्ये नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल संस्थांमार्फत अनुक्रमे १.३७ लाख मे.टन आणि १.४० लाख मे.टन कांदा खरेदी करण्यात आला आहे.

सदर योजनेतील मार्गदर्शक अटी व शर्तींनुसार आणि गुणवत्ता मापदंडाच्या पडताळणीच्या आधिन राहून बहुतांश कांदा उत्पादक शेतकऱ्यांची देयके निर्धारित वेळेत वितरीत करण्यात आली आहेत. काही शेतकऱ्यांची तांत्रिक कारणास्तव देयके अदा होऊ शकली नाही. सदर देयके अदा करण्याची नाफेड यांच्यास्तरावरून कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदूर मधमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) कालव्याच्या पाण्यामुळे नापीक होत असलेल्या शेतीसाठी जलनि:स्सारणाची कामे करण्याबाबत

**(४२)** * **६६१२ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदूर मधमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) या एक्सप्रेस कालव्याच्या पाण्यामुळे तसेच पावसाच्या पाण्याच्या साठ्यामुळे नापीक होत असलेल्या शेती क्षेत्रासाठी जलनि:स्सारणाची कामे करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ तसेच दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग तसेच पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नांदूर मधमेश्वर एक्सप्रेस कालव्यामुळे व पावसाच्या पाण्यामुळे नापीक होत असलेल्या क्षेत्रासाठी जल:निस्सारणाची कामे करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, खरे आहे.
(२) या अनुषंगाने मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे दिनांक २१/०९/२०२५ व १३/१२/२०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहेत. सदर निवेदनांच्या अनुषंगाने पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांचेमार्फत क्षेत्रिय पाहणी करण्यात आली असून नांदूर मधमेश्वर एक्सप्रेस कालव्यामुळे नापीक होत असलेल्या क्षेत्रासाठी कायमस्वरुपी उपाययोजनेसाठी खेडलारुई, वाकद शिरवाडे, देवगाव व देवगाव-२ या चर योजनेच्या परिक्षण व देखभाल दुरुस्ती कामांना सन २०२६-२७ च्या प्रापणसूचीमध्ये मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२६-२७ च्या प्रापणसूचीमध्ये सदर क्षेत्रातील परिरक्षण व देखभाल दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजित आहे.

कालव्यास संधानक अस्तरीकरण असल्याने नांदूर मधमेश्वर एक्सप्रेस कालव्यातून पाझर नगण्य आहे. कालव्याच्या उत्तर बाजूने (निरीक्षण पथाचे बाजूने) येणारे पावसाचे पाणी नैसर्गिक नाल्यांमध्ये निघण्यासाठी जलद कालव्याचे लगत नैसगिक नाल्यांपर्यंत चर, अस्तरीकरण केलेले चर, तसेच काही ठिकाणी बंदिस्त पाईपलाईन केलेली आहे. परंतु लगतच्या शेतकऱ्यांकडून अतिक्रमण करुन सदरचे चर बुजवले जात असून वेळोवेळी विभागीय कार्यालयामार्फत सदरचे चर उकरुन पूर्ववत करण्यात येत आहेत.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## तासगाव (जि.सांगली) शहरात अफगाणी बेदाण्याची तस्करी करून साठवण व विक्री होत असल्याबाबत

**(४३) * ७६७४ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगाव (जि.सांगली) शहरातील एका कोल्ड स्टोरेजमध्ये परदेशातून आयात केलेल्या निकृष्ट दर्जाचा बेदाणा साठवणूक केला असून, बेदाणा माल स्वच्छ करून साध्या बॉक्समध्ये भरून स्थानिक माल असल्याचा भास निर्माण करित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, द्राक्षे उत्पादक शेतकरी अडचणीत असताना जिल्ह्यातील काही व्यापारी छुप्या मार्गाने चिनी बेदाण्याची अफगाणिस्तान मार्गे तस्करी करून त्याची साठवण करीत आहेत, तसेच त्यावर प्रक्रिया करून भारतीय बनावटीचे आवरण घालून बेदाणा बाजारात विक्रीसाठी आणत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ग्राहकांच्या आरोग्यास निर्माण होणाऱ्या धोक्याची दखल घेऊन अफगाणी बेदाण्याची छुप्या मार्गाने तस्करी करुन साठवण व विक्री करीत असलेल्या संबंधित दोषींवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) सदर बेदाणा कृषी उत्पन्न बाजार समिती, जि.सांगली येथे विक्रीस आलेला नाही.
(३) कृषी उत्पन्न बाजार समिती तासगांव यांनी संबंधित बेदाणा व्यापाऱ्यांना बाजार समितीमध्ये बेदाणा खरेदी विक्री करण्यास दिनांक ०१/०१/२०२६ पासून बंदी घातली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहर व उपनगरात अनधिकृतपणे पूर्व प्राथमिक शिक्षण देणारी खाजगी केंद्रे सुरु असल्याबाबत

**(४४) * ७३६२ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व उपनगर परिसरात अनधिकृतपणे इमारतींच्या पार्किंगमध्ये, गच्चीवर, दुकानांच्या वरच्या मजल्यांवर तसेच बेसमेंटमध्ये कोणतीही परवानगी व सुरक्षितता निकष न पाळता पूर्व प्राथमिक शिक्षण देणारी खाजगी केंद्रे प्रि-स्कूल (बालवाडी) सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, अशा ठिकाणी सुरू असलेल्या प्रि-स्कूलमुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होण्यासोबतच त्यांच्या शैक्षणिक व मानसिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत असून अशा अनधिकृत व नियमबाह्य प्रि-स्कूलची संख्या किती आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बालसुरक्षा, अग्निसुरक्षा, इमारत वापर प्रमाणपत्र (OC), खेळाची जागा, स्वच्छता व वाहतूक सुरक्षितता यांसारख्या निकषांची पूर्तता न करणाऱ्या प्रि-स्कूल विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) वय वर्ष ३-६ वयोगटातील बालकांना दर्जेदार व सुरक्षित पूर्व प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने, वयोगट ३ ते ६ करीता पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांची माहिती एकत्रित स्वरूपात राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, तसेच पालकांनाही उपलब्ध व्हावी याकरीता वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी education.maharashtra.gov.in या शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावरील Pre School

Registration Portal वर करणे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये बंधनकारक करण्यात आले आहे. सदर नोंदणी प्रक्रियेअंतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थांविषयी प्राथमिक माहिती जसे की पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेचे ठिकाण, व्यवस्थापन, वर्ग खोल्या व विद्यार्थ्यांची संख्या, शाळेत उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सुविधा (शाळेची इमारत, क्रिडांगण, स्वछता गृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, सिसिटीव्ही) तसेच शिक्षक व इतर कर्मचारीवर्ग यांविषयी माहिती पुरविणे अपेक्षित आहे. आतापर्यंत राज्यातील १२,७३३ इतक्या पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी झालेली आहे व इतर खाजगी पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थांना देखील नोंदणी करण्याविषयी आव्हान करण्यात आलेले आहे.

(३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० (NEP २०२०) नुसार प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण (ECCE) हे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्यासाठी गुणवत्तापूर्ण, सुरक्षित, खेळाधारित व बालकेंद्रित शिक्षण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर खाजगी बालवाटिकांच्या नोंदणी संदर्भात अधिनियम प्रस्तावित करण्यात येणार आहे. सदर अधिनियमाचा मुख्य उद्देश राज्यातील सर्व खाजगी बालवाटिकांची अनिवार्य नोंदणी, नियमन व गुणवत्ता सुनिश्चित करणे हा असणार आहे. या अधिनियमाअंतर्गत बालवाटिकांच्या नोंदणीसाठी सक्षम प्राधिकरणाची नेमणूक, ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदणी प्रक्रिया, नोंदणीची वैधता (३ वर्षे) व नूतनीकरणाची तरतूद करण्यात येणार आहे. नोंदणीविना कोणतीही बालवाटिका चालविण्यास मनाई करण्यात येणार आहे.

सदर अधिनियमामध्ये बालवाटिकांवर किमान गुणवत्ता मानके बंधनकारक करण्यात येणार असून, त्यामध्ये ३-४ तासांचा ECCE कार्यक्रम, १:२० शिक्षक-बालक प्रमाण, बालकेंद्रित अभ्यासक्रम, खेळणी व आनंददायी शिक्षण साहित्य, तसेच सुरक्षित व बालस्नेही पायाभूत सुविधा यांचा समावेश असणार आहे. प्रस्तावित अधिनियमाधील तरतुदींचा नियमभंग झाल्यास नोंदणी रद्द करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणास देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जलि्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतंर्गत मंजूर करण्यात आलेला शाळांच्या बांधकामाची देयके कंत्राटदारांना अदा करण्याबाबत

**(४५)** * **८४८३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतंर्गत ८ शाळा घोषित करून प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी शाळांच्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये काही शाळांना प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निम्मा निधी संबंधित कंत्राटदारांना वितरित करण्यात आल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२६ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी तालुक्यातील थार, आर्वी तालुक्यातील रसुलाबाद, कारंजा तालुक्यातील सावळी (खुर्द) येथील आदर्श शाळांची बांधकामे पूर्ण करूनही संबंधित कंत्राटदारांना शासनाकडून उर्वरित देयके अदा करण्यात टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतंर्गत वर्धा जिल्ह्यातील निवडलेल्या ८ आदर्श शाळा बांधकामांना सन २०२२-२३ मध्ये निधी मंजूर करण्यात आलेला आहे.सदर मंजूर निधिमधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा थार व जि.प.प्राथमिक शाळा रसुलाबाद या शाळेतील संबंधित कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे. वर्धा व इतर जिल्ह्यातील निधीचे जे देयक अद्याप बाकी आहेत व उर्वरित निधी वितरित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.